cmyk

## संपादकीय

### निवडणूक आयोगाने तारतम्य ठेवण्याची गरज

बिहार विधानसभेची निवडणूक आता तीन-चार महिन्यांवर येऊन ठेपली आहे. ही निवडणूक तोंडावर असताना नव्या मतदारयाद्या तयार करण्याचा निवडणूक आयोगाने घातलेला घाट सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडलेला दिसतो. मुख्य म्हणजे पुरावा म्हणून रेशन कार्ड व आधार कार्ड ग्राह्या धरले जाणार नसेल, तर या मतदारयाद्यांच्या पडताळणीत काही काळेबेरे तर नाही ना, अशी शंका उपस्थित होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. देशातील महत्त्वाचे राज्य म्हणून बिहारचा उल्लेख केला जातो.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### ओबीसी विद्यार्थी भोजन आणि निर्वाह भत्त्यापासून वंचित

संभाजीनगर-ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी शहरात येतात आणि या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, समाजकल्याण विभागाकडून भोजन आणि निर्वाह भत्ता यासाठी पाच हजार शंभर रुपये प्रत्येक महिन्याला दिले जातात, छत्रपती संभाजीनगरमध्ये असेच शिक्षण घेणारे ८८ विद्यार्थी आहेत, या विद्यार्थ्यांना मात्र पाच हजार शंभर ऐवजी दोन ते अडीच हजार रुपये दिले जाते असा आरोप या विद्यार्थ्यांनी केला आहे, याबाबत अनेक वेळा तक्रारी देऊनही कुठलीही कारवाई केली जात नसल्याचे या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.


बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-७६ | शुक्रवार, दि.११ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### शेतकरी जमले तर फडणवीस स्वत: चालत येतील-बच्चू कडू

शेतकऱ्यांना एकत्र करणे म्हणजे चार पाच वाघ एकत्र करणं होय. गावागावात गट तटात शेतकरी विभागला आहे.आपल्या सभेला शेतकऱ्यांची गर्दी झाली तर फडणवीस स्वत: चालत येतील असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

### कडा गटात प्रभाग रचनेत विशिष्ट समाजाचा समावेश-ठोंबरे

केज- तालुक्यातील विडा जिल्हा परिषद गटात विशिष्ट समाजाच्या गावांना बाहेर काढून काही विशिष्ट समाजाच्या गावांचा समावेश केला जात आहे असा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते दत्तात्रय ठोंबरे यांनी केला आहे.

### नाफेडची कांदा खरेदी बंद, शेतकरी अडचणीत

नाशिक-लासलगाव (नाशिक) सध्या कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला. घोषणा होऊन अद्याप नाफेडची कांदा खरेदी नाही. नाफेडला जर कांदा खरेदी करायचा असेल तर तीन हजार रुपये क्विंटलने कांदा करावा म्हणजे शेतकऱ्यांना लाभ होईल, अशी शेतऱ्यांची मागणी आहे.

### ईडीकडून २९ सेलिब्रिटींवर गुन्हे दाखल

हैदराबाद-ईडीकडून २९ सेलिब्रिटींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात प्रकाश राज, विजय देवरकोंडा, राणा डग्गुबत्ती यांचाही समावेश आहे. सट्टेबाजीच्या ॲपशी संबंधित प्रकरणात हे गुन्हे दाखल झाले आहेत. हैदराबादच्या सायबराबाद पोलिसांनी एफआयआर दाखल केली आहे.

### खा.भुमरेंच्या भावजयसाठी मद्य परवान्याची जलद प्रक्रिया

संभाजीनगर-खासदार भुमरेंच्या भावजयसाठी मद्य परवान्याची जलद प्रक्रिया करण्यात आल्याचा आरोप आहे. मद्य परवाना ट्रान्सफर प्रक्रिया वायूवेगात राबवल्याचा आरोप करण्यात आला आहे. औरंगाबाद खंडपीठातील याचिकेमुळे फाईलचा वेगवान प्रवास समोर आला आहे. त्यामुळे २०२३ मधील प्रकरणाची राज्यभरात चर्चा होत आहे.

### तिघांकडून एका तरुणाला बेदम मारहाण, व्हिडीओ व्हायरल

बीड-जिल्हा रुग्णालयाच्या गेटवरील मुख्य रस्त्यावर तिघांकडून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली आहे. विशेष म्हणजे अवघ्या काही मिटर अंतरावर पोलिस अधीक्षक कार्यालय आणि दुसऱ्या बाजूला शिवाजीनगर पोलीस स्टेशन आहे. याच परिसरात बराच वेळ ही मारहाण सुरू होती. दरम्यान मारहाण करणारे कोण होते? मारहाण का झाली? याची माहिती मिळू शकली नाही. तर अद्यापपर्यंत कुठलीही कारवाई झाल्याची माहिती मिळालेली नाही.

### तानाजी सांवत अधिवेशनात येणार

मुंबई-डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तानाजी सावंत पावसाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यात सहभागी होणार आहे. तानाजी सावंत यांची एन्जोप्लास्टी शस्त्रक्रिया झाल्यामुळे अधिवेशनाला उपस्थित राहू शकले नव्हते.

### मंत्री संजय शिरसाट यांना आयकर विभागाची नोटीस

संभाजीनगर : सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्यावर गेल्या काही दिवसात भ्रष्टाचाराबाबत अनेक आरोप झाले असून संभाजीनगरात एका कार्यक्रमात संजय शिरसाठ यांचे एक वक्तव्य मात्र चांगलेच चर्चेत आले आहे. मला आयकर विभागाकडून नोटीस आल्याची त्यांनी जाहीर कबुली दिली आहे.

# पीकविम्यात शेतकऱ्यांचे मरण सरकारचा ट्रीगरच्या आड मोठा डाव

## पीक विमा भरपाईचे ट्रीगर पुन्हा लागू होणार नाहीत-कृषिमंत्री कोकाटे

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभेत गुरूवारी पुन्हा पीकविमा भरपाईचे ४ ट्रीगर काढल्याचा मुद्दा गाजला. शासनाने विमा भरपाईचे ४ ट्रीगर पुन्हा लागू करावे, अशी मागणी आमदार रोहत पवार आणि राजेश विटेकर यांनी केली. मात्र "पीक विमा योजनेतील बदलामुळे राज्याचे आता ४५०० ते ५ हजार कोटी रुपये वाचणार असून, शेतीमध्ये वर्षाला ५ हजार कोटींची भांडवली गुंतवणूक करण्यासाठी पीक विमा योजनेचे ट्रीगर काढले आहे. हे ट्रीगर पुन्हा लागू केले जाणार नाहीत," असे राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. ट्रीगर लागू न केल्याने सरकारचे जरी ५ हजार कोटी

पान २ वर





### शेतकऱ्यांना सर्वाधीक मदत त्या चार ट्रीगरमधून - आ.रोहीत पवार

आमदार रोहीत पवार म्हणाले की, पीक विमा योजनेत सर्वाधिक विमा भरपाई स्थानिक नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून मिळते. गेल्यावर्षीचे आतापर्यंत ३ हजार ५३२ कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यापैकी २ हजार ७७५ कोटी रुपये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून देण्यात आले. म्हणजेच एकूण भरपाईच्या ८० टक्के भरपाई फक्त नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून देण्यात आले. पण सरकारने स्थानिक नैसर्गिक आपत्तीसह चार ट्रीगर विमा योजनेतून काढून टाकले आहेत. मग सरकारने विमा योजनेत हा बदल कशामुळे केला आणि विमा योजनेतून काढलेले ट्रीगर पुन्हा लागू करणार का ? असा प्रश्न पवार यांनी विचारला.

# शहरी नक्षलवादावर सरकारी हातोडा

## जनसुरक्षा विधेयक आवाजी मतदानाने मंजूर, उपद्रवी संघटनांविरोधात सरकारच्या हाती मोठे शस्त्र



**मुंबई । प्रतिनिधी**

**सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटनांवर कडक कारवाई करण्यासाठी जनसुरक्षा विधेयक मांडण्यात आले होते. ते आता मंजुर करण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे शहरातील शांतता भंग करणाऱ्या संघटनांचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारच्या हाती हे मोठे शस्त्र आले आहे.**

बहुचर्चित राज्य जनसुरक्षा विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले आहे. शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी हे विधेयक मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत मांडले होते. तब्बल १२,५०० सूचनांचा अभ्यास करुन राज्य जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर करण्यात आलं होते. ते आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत जनसुरक्षा विधेयक मांडले. शहरी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी सरकारने हे विधेयक आणले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये

पान २ वर

### शहरी नक्षलवादाला लगाम बसणार

सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटनांवर कडक कारवाई करण्यासाठी यामुळे सरकारच्या हाती अधिकार येणार आहेत.

### विधेयकात काहीसा बदल

जनसुरक्षा विधेयक संयुक्त समितीचा अहवाल माझ्याच्या हाती लागला. विरोधक आणि सामाजिक संघटनांच्या विरोधानंतर त्यामध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले. व्यक्ती आणि संघटनाऐवजी कडव्या विचारांच्या तत्सम संघटना असा शब्द त्यामध्ये नमूद करण्यात आला. या विधेयकाला १२ हजार ५०० सूचना, हरकती आल्या होत्या. त्याचा अभ्यास करुन मूळ विधेयकात तीन महत्त्वाचे बदल करण्यात आल्याची माहिती आहे.

### विधेयकावर संयुक्त समिती

या विधेयकावर अनेक संघटनांनी आक्षेप घेतला होता. अखेर गुरुवारी हे विधेयक मांडण्यात आलं. दरम्यान जनसुरक्षा विधेयकाच्या वादानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती स्थापन केली. या समितीत सर्वपक्षीय २५ सदस्य आहेत. त्यामध्ये जितेंद्र आव्हाड, सतेज पाटील, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, अजय चौधरी सदस्य होते.

## उपकुलसचिव हेमलता ठाकूर प्रकरण

### विद्यार्थी संघटना आक्रमक, कुलगुरूविरोधात घोषणाबाजी



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विविध विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत कुलगुरू व कुलसचिव यांच्या विरोधात घोषणाबाजी करत निदर्शने, आंदोलन केले. यावेळी पोलीस आणि विद्यार्थी यांच्यात शाब्दिक चकमक उडाली.**

उपकुलसचिव हेमलता ठाकरे यांनी बुधवारी (दि.९) आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, या प्रकरणी सुसाईड नोट मध्ये ज्यांची नावे आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी यावेळी

पान २ वर



**मुंबई- राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांना मुंबई येथील निवासस्थानी गुरुपौर्णिमेनिमित्त शुभेच्छा देऊन आशीर्वाद घेताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत दिसत आहेत.**

# गणेशोत्सव आता महाराष्ट्र राज्याचा महोत्सव

## सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची विधानसभेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**१०० वर्षाहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला "महाराष्ट्र राज्य महोत्सव" म्हणून गुरूवार दि.१६ रोजी घोषित करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही घोषणा विधानसभेत केली.**

विधानसभेत निवेदन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव १८९३ साली लोकमान्य टिळकांनी सुरू केला, या उत्सवाची पार्श्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. त्या पद्धतीनेच ते आज चालू आहे. महाराष्ट्राचा गौरव आणि



अभिमान असलेला आपला गणेशोत्सव आहे. देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटीबद्ध राहील. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला कुठे ना कुठे परंपरागत गणेशोत्सव बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न विविध न्यायालयात जरूर केला. पण मला या ठिकाणी मुद्दामहुन उल्लेख करायचाय हे महायुतीचे सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात या सगळ्या निर्बंधांना, आलेल्या स्पिड ब्रेकरला

पान २ वर

# निवृत्तीनंतर अमित शहा नैसर्गिक शेती करणार

## निवृत्तीच्या विधानाने राजकीय गोटात खळबळ

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**गृहमंत्री अमित शहा यांच्या एका वक्तव्याने चांगलीच खळबळ उडाली असून राजकीय निवृत्तीनंतर आपण आयुष्यभर नैसर्गिक शेती करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

भारतात राजकारण्यांसाठी निवृत्तीचे वय ठरलेले नाही. काहीजण लवकर निवृत्त होतात, तर काहीजण वयाच्या शेवटपर्यंत राजकारणात सक्रीय राहतात. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवृत्तीबाबत मोठे विधान केले आहे. राजकीय निवृत्तीनंतर पुढील आयुष्यात काय करणार हे अमित शाह यांनी अहमदाबादमधील एका कार्यक्रमात सांगितले आहे.



राजकारणातून निवृत्त झाल्यावर मी आयुष्यभर नैसर्गिक शेती करण्याचे ठरवले आहे. तसेच निवृत्तीनंतर

पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू:३६.०० क्विंटल | २,४७१ | २,६४० | २,५३७ |
| ज्वारी/हायब्रिड :१५.०० क्विंटल | २,००० | २,६६१ | २,४१७ |
| मका/लोकल: २.५०क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : २३.०० क्विंटल | ५,७०० | ६,४५१ | ६,१७२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,४०० | ४,८०० | ४,६०० |
| बाजरी: १२.५० क्विंटल | १,९११ | २,६५६ | २,२६५ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,४०० | ५,४५० | ५,४१६ |

# आठवा वेतन आयोग लागू झाल्यास कर्मचारी होणार मालामाल

## सातव्या वेतन आयोगाची मुदत ३१ डिसेंबरला संपणार; पगार ३० ते ३४ टक्क्यांनी वाढणार

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**आठव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी जानेवारी २०२६ पासून होणे अपेक्षित आहे. सातव्या वेतन आयोगाचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ ला संपणार आहे. त्याची अमलबजावणी झाली तर ३० ते ३४ टक्के कर्मचाऱ्यांचा पगार वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारक यांना आठव्या वेतन आयोगाची प्रतीक्षा आहे. रिपोर्टनुसार आठव्या वेतन आयोगाच्या



अंमलबजावणीनंतर कर्मचाऱ्यांचा पगार आणि पेन्शनमध्ये ३० ते ३४ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. द इकोनॉमिक्स टाईम्सच्या वृत्तानुसार अम्बित कॅपिटलच्या रिपोर्टनुसार आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा फायदा जवळपास १ कोटी १० लाख जणांना होणार आहे.

पान २ वर

### अशी होणार पगारात वाढ

महत्त्वाची बाब म्हणजे आठव्या वेतन आयोगाला मान्यता दिल्यानंतर फिटमेंट फॅक्टर प्रमाणे पगारात बदल होतील. फिटमेंट फॅक्टरचा वापर सध्याच्या मूळ वेतनाशी गुणाकार करुन नवे मूळ वेतने काढले जाईल. सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी वेळी फिटमेंट फॅक्टर २.५७ इतका होता. त्यामुळे मूळ वेतन ७००० हजार रुपयांवरुन १८००० रुपयांपर्यंत वाढले होते. संशोधन अहवालानुसार फिटमेंट फॅक्टर १.८३ ते २.४६ असू शकतो. यावरुन आठव्या वेतन आयोगात मूळ वेतन आणि पेन्शन कितीने वाढणार हे निश्चि होऊ शकते.

### ४४ लाख केंद्रीय कर्मचारी, ६८ लाख पेन्शनर्सला होणार लाभ

आठव्या वेतन आयोगाचा फायदा केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारकांना होणार आहे. यामध्ये ४४ लाख केंद्र सरकारचे कर्मचारी आणि ६८ लाख पेन्शधारकांना होणार आहे. आठवा वेतन आयोग मंजूर झाल्यानंतर मूळ वेतनात, भत्त्यांमध्ये आणि निवृत्तीनंतर मिळणाऱ्या फायद्यांमध्ये वाढ होईल.

cmyk

## अग्रलेख

# निवडणूक आयोगाने तारतम्य ठेवण्याची गरज

बिहार विधानसभेची निवडणूक आता तीन–चार महिन्यांवर येऊन ठेपली आहे. ही निवडणूक तोंडावर असताना नव्या मतदारयाद्या तयार करण्याचा निवडणूक आयोगाने घातलेला घाट सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडलेला दिसतो. मुख्य म्हणजे पुरावा म्हणून रेशन कार्ड व आधार कार्ड ग्राह्य धरले जाणार नसेल, तर या मतदारयाद्यांच्या पडताळणीत काही काळेबेरे तर नाही ना, अशी शंका उपस्थित होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. देशातील महत्त्वाचे राज्य म्हणून बिहारचा उल्लेख केला जातो. राजकीय क्रांतीचे केंद्र म्हणूनही या राज्याकडे पाहिले जाते. म्हणूनच अशा महत्त्वपूर्ण राज्याची सत्ता मिळावी, याकरिता प्रत्येक पक्ष दर निवडणुकीत आपले अस्तित्व पणाला लावत असतो.

मागच्या काही वर्षांपासून या राज्यावर भाजप आणि नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाची सत्ता आहे. असे असले, तरी तेजस्वी यादव यांचा राजद आणि काँग्रेसचे या युतीपुढे तगडे आव्हान असेल. राज्याच्या राजकारणावर नितीश यांचा चांगला प्रभाव असला, तरी तो आता पूर्वीसारखा राहिलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. भाजपानेही बिहारमध्ये सर्वदूर हातपाय पसरले आहेत. तथापि, तेजस्वी यादव यांनी अलीकडच्या काळात राज्याच्या राजकारणात मोठी मजल मारली आहे. हे बघता राजद व काँग्रेसचे सत्ताधाऱ्यांपुढे मोठे आव्हान असेल. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाची मतदारयाद्यांची पडताळणी भुवया उंचावणारी ठरते. मतदारांकडे प्रामुख्याने आधारकार्ड आणि मनरेगा जॉब कार्ड उपलब्ध आहेत. परंतु, ओळखीसाठी आवश्यक असलेल्या पुराव्यांतून या दोहोंना वगळण्यात आले आहे. मतदार ओळखपत्रांशी आधारकार्ड जोडण्याची निवडणूक आयोगाची योजना असल्याचे सांगितले जाते. तथापि, ओळखीचा पुरावा म्हणून त्यातून आधारकार्डच वगळले जाणार असेल, तर त्यातून फक्त गोंधळ वाढू शकतो. खरे तर मतदान ओळखपत्रामध्येही अद्याप अनेक त्रुटी आहेत. नाव, वय, पत्ता अशा अनेक पातळ्यांवर चुका झाल्या आहेत. काहींना वारंवार नोंद करूनही मतदान ओळखपत्र मिळत नाही किंवा यादीतही नावाचा समावेश होत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे देशाचा नागरिक असूनही अनेकांना मतदानापासून वंचित रहावे लागते. असे असताना आयोग आधार कार्डच ग्राह्य धरत नसेल, तर त्यातून लाखो नागरिक मतदानापासून दूर राहण्याचा धोका संभवतो.

लोकशाही प्रक्रियेमध्ये मतदान हे पवित्र कर्तव्य मानले जाते. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाला अनेकविध उपक्रम राबवावे लागतात. जनजागरण करावे लागते. पक्षांतर, फोडाफोडी, एकपक्षीय हुकूमशाही, भ्रष्टाचार यांसारख्या कारणांमुळे मतदारांमधील उदासीनताही दिवसेंदिवस वाढत आहे. असे नकारात्मक वातावरण असताना निवडणूक आयोगासारखी संस्था अडवणुकीचे धोरण अवलंबत असेल, तर त्यातून लाखो मतदार मतदानापासून वंचितच राहतील. शिवाय त्यांच्यातील मतदानाविषयीची उदासीनता किंवा नकारात्मकता अधिक वाढण्याची भीती आहे. त्यामुळे या मतदारयाद्या पडताळणीला स्थगिती देण्याची विरोधी पक्षांनी केलेली मागणी अयोग्य ठरू नये. मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक व्हावी, त्यातील त्रुटी दूर व्हाव्यात, बोगस मतदानाला आळा बसावा, यासाठी आयोगाला वेगवेगळी पावले उचलावीच लागतात. त्या दृष्टीकोनातून आयोगाकडून उपाययोजना होण्यात काही गैर नाही. मात्र, अशा उपाययोजना करताना तारतम्य हवे. एका राज्यात एक व दुसऱ्या राज्यात दुसरा नियम, असे होऊ नये. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप अजूनही विरोधकांकडून करण्यात येत आहे. ७६ लाख मतदार कसे वाढले, याचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. हे पाहता बिहार निवडणुकीत आयोगाने पडताळणीचा घोळ घालणे, हे आयोगाच्या प्रतिमेला अधिक धक्का लावणारे ठरू शकते. या पार्श्वभूमीवर राजद, काँग्रेससह दहा पक्षांनी सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली आहे. आयोगाच्या या मोहिमेच्या विरोधात एकूण पाच याचिकाही दाखल आहेत. यामध्ये स्वयंसेवी संस्थांबरोबरच योगेंद्र यादव, महुआ मोईत्रा यांच्या याचिकांचाही समावेश असल्याचे दिसून येते. मुक्त व निष्पक्ष निवडणुकांवर या मनमानीने परिणाम होऊ शकतो, अशी भीती यामध्ये व्यक्त करण्यात आली आहे.

खरे तर निवडणूक आयोग ही स्वायत्त व निष्पक्ष संस्था आहे. परंतु, अलीकडच्या काळात आयोगाच्या या निष्पक्षतेवर वारंवार शंका घेतल्या जाऊ लागल्या आहेत. खरेतर लोकशाहीमध्ये सत्ताधारी व विरोधक या दोहोंबाबत समसमान दृष्टीकोन ठेऊन आयोगाने प्रामाणिकपणे काम करणे अपेक्षित आहे. हे पाहता सद्य:स्थितीत आयोगानेही आत्मपरीक्षण करणे क्रमप्राप्त ठरते. बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नितीशकुमार यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना ३५ टक्के आरक्षणाची घोषणा केली आहे. पुढच्या काळात आणखी काही घोषणा होऊ शकतात. राजद व काँग्रेसही मतदारयादी गोंधळ, महागाई, नवे कायदे याविरोधात रान उठवून भाजप, संजदविरोधात वातावरणात तापवण्याचा प्रयत्न करत आहे. या मतसंग्रामात कुणाची सरशी होते, हे आगामी काळात कळेलच.

# राज्यातील सामान्य कार्यकर्त्यांचा असामान्य आधार म्हणजे 'देव'राम पळसकर!

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे पीएस असलेल्या पळसकर यांच्या जन्मदिना निमित्त राज्यातील अवघ्या मित्रपरिवाराने वेग वेगळ्या माध्यमातून शुभेच्छा देत विविध उपक्रम राबवत मोठया उत्साहाने वाढदिवस साजरा केला. कारण राज्यातील देवभाऊ वर प्रेम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांचा आधार म्हणजे देवराम पळसकर सर आणि ते त्यांनी त्यांच्या कृतीमधून कायम सिद्ध केलं आहे.**

अशातच त्यांना थोड्या लेट पण थेट शुभेच्छा दिल्या त्या मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे बीड जिल्ह्यातील कट्टर समर्थक असलेल्या संभाजी सुर्वे यांनी, यावेळी त्यांनी बोलताना सांगितले की, या शुभेच्छा आहेत त्या व्यक्तिमत्त्वाला जो विशेष कार्य अधिकारी म्हणून आणि देवेंद्रजी यांच्या सोबत सावली प्रमाणे राहून स्वतः पेक्षाही जास्त मुख्यमंत्र्यांची काळजी घेणारे व्यक्तिमत्व म्हणुन ओळखले



जातात. पण आमच्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांसाठी ते केवळ अधिकारी नाहीत तर ते प्रेरणास्थान आहेत, मार्गदर्शक आहेत आणि आमच्या आशेचा किरण आणि कर्तृत्वाचा दीपस्तंभही आहेत. सत्तेच्या शिखरावर असतानाही सामान्य कार्यकर्त्यांशी जोडलेले राहणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि प्रत्येक कार्यकर्त्याला स्वतःचा मित्र समजणे ही त्यांची खरी ताकद आहे. त्यांचे काम केवळ प्रशासनापुरते मर्यादित नाही, तर ते कार्यकर्त्यांचे ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस'' बनून प्रत्येक गावोगावी, प्रत्येक मनामनात उमटले आहेत. अनेकदा त्यांच्या शब्दांनी हिम्मत मिळते, आणि त्यांच्या हास्याने थकलेली पावलं पुन्हा चालायला लागतात. तर कधी कधी रागावल्याने जगावर चुकीच्या विषयाला ब्रेक देखील बसतो. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ईश्वर त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि अधिक कार्यक्षमतेसह लोकसेवा करण्याची संधी देवो अशा आशयाच्या शुभेच्छा बीड जिल्ह्यातील देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक असलेले संभाजी सुर्वे यांनी श्री. देवराम पळसकर यांना दिल्या.

# पोलीस हवालदाराला चार हजाराची लाच घेताना पकडले

**जालना । पतिनिधी**

**एका गावातील व्यक्ती सोबत झालेल्या भांडनात एमएलसी जबाब घेण्यासाठी खाजगी वाहनाचा खर्च व तपासात मदत करण्यासाठी राजू राठोड, वय ४४ वर्ष, पद पोलीस हवालदार बक्कल नंबर ७७६ नेमणुक पो. ठाणे मंठा जि. जालना यांनी ४,५००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती ४०००/–रुपयाची लाच स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडले. गुन्हा घ.ता.वेळ व ठिकाण समृद्धी बिअरबार समोरील मंठा तहसिलकडे जाणारे रोडवर मंठा इथे घटना घडली.**

यातील तक्रारदार यांचे त्यांचे गावातील व्यक्ती सोबत दि.१५/०६/२०२५ रोजी भांडणं झाले होते त्यावरून त्यांनी एकदुसऱ्या विरुद्ध पो.ठाणे मंठा येथे दिलेल्या तक्रारीवरून क्रॉस गुन्हे दाखल आहेत. सदर भांडणात तक्रारदार हे जखमी होऊन जालना येथील रुग्णालयात उपचार घेत असताना आलोसे हे त्यांचा जबाब घेण्यासाठी जालना येथे खाजगी वाहनाने आले होते. त्या वाहनाचा खर्च १,५०० रु व तपासात मदत करण्यासाठी ३,००० रु असे एकूण ४,५००/– रुपये लाचेची मागणी आलोसे राठोड यांनी तक्रारदार यांचेकडे केली. परंतु, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तक्रार केली. सदर तक्रारीवरुन लाच मागणी पडताळणी केली असता राजू राठोड, यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष जबाब घेण्यासाठी लाचेची मागणी करुन तडजोड अंतो ४०००/–रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने ॲन्टी करप्शन ब्यूरो, जालना चे पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले व अंगझडती घेतली असता लायेच्या ४०००/–रुपये शिवाय इंतर १०८०/–रुपये रोख रक्कम व रेडमी कंपनीचा मोबाईल फोन मिळून आला आहे. आलोसे राजू राठोड, यांच्यावर पोलीस ठाणे मंठा येथे गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कामगीरी श्रीमती, माधुरी केदार कांगणे पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, श्री. सुरेश नाईकनवरे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक तथा पो. उप अधिक्षक ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. बी. एस. जाधवर, सहाय्यक सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय जालना व पथकातील पोलिस अंमलदार, गजानन घायवट, पो. अं. गणेश चेके, गजेंद्र भुतेकर, मनोहर भुतेकर, अमोल चेके, शिवलिंग खुळे, गजानन खरात, श्रीनिवास गुडुर, भालचंद्र बिनोरकर यांनी केली.

# गुरुपौर्णिमा निमित्त स्वामी समर्थ मंदिरात रक्तदान शिबिर

**अंबड । प्रतिनिधी**

श्री गुरू पौर्णिमा उत्सवा निमीत्त श्री. स्वामी समर्थ मंदीर अंबड येथे श्री सद्गुरू श्री स्वामी समर्थ पुजन, महाआरती, अन्नदान महाप्रसाद व भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले या मध्ये ५२ रक्त दात्यांनी रक्तदान केले २००० भावीकानी दर्शनाचा पुजनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला या मधील रक्त दाते कृष्णा राठोड, शुक्रजय काळेगोरे, डिगंबर वराडे, भाऊसाहेब तौर, वैभव वानखेडे, सचिन साठे, सुरज राऊत, कु.प्रिती भवर, रोहीत बिंदु, राधाकिसन पिवळ, विनोद शिंदे, परमेश्वर खरात, नरेंद्र माटोले (५२ वे रक्तदान), देवानंद चित्राल (५० वे रक्तदान), योगेश्वर वाघ, युवराज साठे, विवेक पाटील, शरद जाधव, सुशिल खरात, सुरेश सवाशे, दिपक चौधरी, पियुष माटोले, सोनाली रेगुडे, विनोद जाधव, संदिप पालवे, रामेश्वर खापरे, योगेश्वर राजगुरू, कुणाल सातपुते, मुकूंद खरात, किशोर मुर्तडकर, महादेव कब्बले, केशव आटकर, प्रकाश मुंजाळ, विष्णु थोरात, गणेश वराडे, भाऊसाहेब मुळे, योगेश चव्हाण, गणेश सावंत, हरिष वाघमारे, दर्शन पवार, कैलास घारके, शरद पाटोळे, अचित सावंत, विनोद मगर, महेश जगदाळे, दिनेश काकडे, वैभव देशपांडे, रमेश वराडे, श्रीकिसन जाधव, पवन साळुंके, हरीओम काटकर हा कार्यक्रम यशस्वीते साठी मंदीराचे अध्यक्ष श्री. सतिष सोडाणी, केदार मंत्री, सहसचिव डॉ. सतिष सारडा, सदस्य श्री. रमेश सोनवणे, व्यवस्थापक पंढरीनाथ जाधव,



पुजारी गजानन देशमुख, कर्मचारी पुरुषोत्तम ढोले, दिपक चौधरी, शंकर पिरानाईक, प्रदिप जिगे, सेवेकरी पियुष माटोले, मयुर वाव्हळ, बबनराव चिंतामणी, हरणे साहेब, प्रशांत खोमणे, अजिंक्य कुटे, पांडुरंग गव्हाणे, सुरेश दरक, विशाल वराडे, भगवानराव शेडगे, अभिषेक सारडा, सुशिल खरात व अनेक पुरुष व महिला सेवेकरी यांनी परीश्रम घेतले.

# महसूल सहाय्यकाला बँकेत गप्पा मारणे पडले महागात!

## २ लाख ३० हजार चोरट्याने केले लंपास

**अंबड । प्रतिनिधी**

**एसबीआय शाखा अंबड या बँकेमध्ये अंबड तहसील कार्यालयाचा महसूल सहाय्यक रामेश्वर बाराहाते या व्यक्तीचे दोन लाख तीस हजार रुपये भरणा करण्यासाठी बँकेत गेले असता सदरील व्यक्ती मित्र सोबत गप्पा मारीत असतानी बँकेतून दोन लाख तीस हजार रुपये असलेली पिशवी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली यामुळे महसूल सहाय्यक याला गप्पा मारणे पडले महागात. याबाबत एसबीआय शाखेचे व्यवस्थापक कौशिक चौधरी यांना विचारले असता ते म्हणाले की कोणताही व्यक्ती बँकेत आला तर आपल्या पैशाची काळजी स्वत:ने घेणे गरजेचे आहे तसेच पैशाकडे लक्ष ठेवणे गरजेचे असतं पैसे भरणा करीत असताना कोणाशीही बोलणं करू नये दोन लाख तीस हजार रुपयाची कॅश गेल्याप्रकरणी अज्ञात चोरटे आमच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून त्याची सर्व डिटेल्स पोलिसांना देण्यात आले आहे. या घडलेल्या घटना प्रकरणी घटना घडली.**





अंबड पोलिस ठाण्यात महसूल सहाय्यक रामेश्वर बारहाते यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून आज्ञा चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल घाणे हे करत आहे. रामेश्वर बारहाते यांनी आपल्या मित्राकडून त्यांच्या घरगुती अर्थिक अडचणीमुळे हात उसने पैसे घेतले होते. मित्राने कॅश रक्कम नको म्हणत बँक खात्यात टाकण्याचे सांगितल्याने मित्राला पैसे पाठविण्यासाठी बँकेत गेल्यानंतर दोन अज्ञात चोरट्याने भरदिवसा दोन लाख तीस हजार रुपये पळविले आहे. बँकेतील सीसीटीव्ही फुटेज मध्ये अज्ञात चोरटे पैशाची बॅग पळविताना चित्रित स्पष्ट झाले. २ लाख ३० हजारांची रोकड असलेली पिशवी चोरट्याने चक्क काऊंटरवरून पळवली. ही धक्कादायक घटना अंबड भारतीय स्टेट बँकेत घडली आहे. चोरीचा हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबड तालुक्यातील शेवगा येथील रामेश्वर गणेश बारहाते हे अंबड तहसील येथे महसूल सहाय्यक म्हणून नोकरी करतात. त्यांनी बँकेत भरणा करण्यासाठी २ लाख ३० हजार रुपयांची रोकड लाल रंगाच्या कापडी पिशवीमध्ये आणली होती. बँकेच्या काऊंटरवर पिशवी ठेऊन ते मित्रासोबत गप्पा मारत होते. त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून असलेल्या चोरट्यांनी पैशांची पिशवी घेऊन पसार झाले. हा सर्व प्रकार बँकेत लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले आहे. या फुटेजच्या आधारे संशयिताचा शोध सुरू करण्यात आल्याचे माहिती अंबड पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख संतोष घोडके यांनी सांगितले. कौडगाव येथील मित्र नितिन झनझने याच्याकडून २ महिन्यांपूर्वी घरगुती कामासाठी हात उसणे पैसे घेतले होते. तेच पैसे परत करण्यासाठी सासऱ्यांकडून ८ दिवसांपूर्वी २ लाख ३० हजार रुपये घरी आणून ठेवले होते. हेच पैसे नितिन झनझने यांच्या नावाची स्लिप भरून बँकेत भरणा करत असताना चोरट्याने लांबवल्याचे रामेश्वर बारहाते यांनी सांगितले.

## पान १ वरून...

### पीकविम्यात शेतकऱ्यांचे मरण

वाचणार असले तरी यात शेतकऱ्यांचे मात्र नुकसान होणार आहे. राज्य सरकारने खरिप २०२५ आणि रब्बी २०२५–२६ हंगामासाठी सुधारित पीक विमा योजना लागू केली. या योजनेत आता पेरणीच न होणे, मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणी पश्चात नुकसान भरपाई हे ट्रीगर विमा योजनेतून काढले आहेत. आता फक्त पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई मिळणार आहे. याच मुद्दावरून विधानसभेत गुरूवारी आमदार रोहीत पवार आणि आमदार राजेश विटेकर यांनी प्रश्न विचारून काढलेले ट्रीगर पुन्हा पीक विमा योजनेत लागू करण्याची मागणी केली. आमदार रोहीत पवार म्हणाले की, पीक विमा योजनेत सर्वाधिक विमा भरपाई स्थानिक नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून मिळते. गेल्यावर्षीचे आतापर्यंत ३ हजार ५३२ कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यापैकी २ हजार ७७५ कोटी रुपये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून देण्यात आले. म्हणजेच एकूण भरपाईच्या ८० टक्के भरपाई फक्त नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून देण्यात आले. पण सरकारने स्थानिक नैसर्गिक आपत्तीसह चार ट्रीगर विमा योजनेतून काढून टाकले आहेत. मग सरकारने विमा योजनेत हा बदल कशामुळे केला आणि विमा योजनेतून काढलेले ट्रीगर पुन्हा लागू करणार का ? असा प्रश्न पवार यांनी विचारला. कृषिमंत्री कोकाटे यांनी आपल्या उत्तरात सांगितले की, कोणत्याही टप्प्यात नुकसान झाले तरी शेवटी उत्पादकतेवर परिणाम होतो. पीक कापणी प्रयोगातून हे स्पष्ट होईलच. पीक कापणी प्रयोगातून उत्पादन कमी दिसले तर विमा भरपाई मिळणारच आहे. त्यामुळे विमा योजनेतून काढलेले ४ ट्रीगर लागू करता येणार नाहीत, असे कृषिमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### भांडवली गुंतवणुकीसाठी बदल

आमदार रोहीत पवार यांच्या प्रश्नाला उत्तर देताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पुन्हा गैरप्रकाराच्या रि ओढत सुरुवात केली. पीक विमा योजनेवर अनेक वेळा चर्चा झाली. अनेक जिल्ह्यात विमा योजनेत गैरप्रकार झाले. एक रुपयात पीक विमा योजनेत कंपन्यांना जवळपास ७५०० हजार कोटींचा नफा झाला. यामुळे शेतकऱ्यांच्याही मनात नाराजी होती. त्यामुळे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शानाखाली एक रुपयात पीक विमा योजना बंद करून जुन्या पध्दतीने योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे केवळ ७५० कोटी रुपयांचेच विमा कंपनीचे टेंडर आले आहे. परिणामी राज्य सरकारचे जवळपास ४५०० ते ५ हजार कोटी रुपये वाचलेले आहेत. याची शेतीत भांडवली गुंतवणूक करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे योजनेत बदल करण्यात आले आहेत,असे कृषिमंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगितले.

--------

### उपकुलसचिव हेमलता ठाकूर प्रकरण

संघटनेने केली. दरम्यान विविध मागण्यासाठी कुलगुरूंना निवेदन देण्याचा आग्रह पदाधिकाऱ्यांनी केला. मात्र, पोलिसांनी निवेदन देण्यासाठी विरोध करून सहा जणांना ताब्यात घेतले. दरम्यान, विद्यार्थी संघटनांना डफड वाजवून निषेध करत होते. याला पोलिसांनी विरोध केला. त्यामुळे विद्यार्थी पदाधिकाऱ्यांनी अधिकारावर गदा आणत असल्याचा आरोप करत पोलिसांशी हुज्जत घातली. पोलिसांनीही त्या नेत्यांना जबरदस्ती गाडीत कोंबून सहा जणांना बेगमपुरा पोलिसांनी ताब्यात घेतले. घटनेनंतर वातावरण तापणार असल्याचा अंदाज आल्याने बेगमपुरा पोलिसांनी सकाळपासूनच विद्यापीठ परिसरात बंदोबस्त लावला होता.

------------

### शहरी नक्षलवादावर

देखील हे विधेयक मांडण्यात आले होते. मात्र तेव्हा ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आले होते. संयुक्त समितीने यामध्ये अनेक महत्त्वाचे बदल सुचवले होते. त्यातील बहुतांश बदल सरकारने स्वीकारले, आणि विधेयकाची सुधारित अवृत्ती आज मांडण्यात आली. कायदा आणि सुव्यवस्थेत व्यत्यय आणणाऱ्या कारवायांना आळा घालता यावा, आणि तसे करणाऱ्यांसाठी विशिष्ट कायदा असावा, यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे.

------------

### निवृत्तीनंतर अमित शहा

संपूर्ण आयुष्य वेद, उपनिषद वाचण्यात वेळ घालवणार असल्याचे अमित शाह यांनी सांगितले आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकीय गोटात चांगलीच चर्चा रंगली असून अमित शहा हे निवृत्ती घेणार आहेत का? याविषयी तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.

-------

### गणेशोत्सव आता महाराष्ट्र

बाजूला करण्याचे काम अतिशय शीघ्रतेने केले. पुढे बोलताना आशिष शेलार म्हणाले की, गणेशोत्सवाच्या बाबतीत महायुती सरकारने भूमिका घेतली असून पोलीस सुरक्षा असेल, आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चरवरचा खर्च असेल, कसबामध्ये आणि विशेषता पुण्यातला महोत्सव असेल मुंबईतला असेल, पूर्ण राज्यातला असेल त्यासाठी लागतील तेवढा निधी राज्य सरकार खर्च करेल. कारण गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही महायुतीची आणि या शासनाची भूमिका आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांना यानिमित्ताने माझी विनंती आहे की, आपण जे वेगवेगळे देखावे करतात त्यामध्ये आपले सैन्य, सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे, आपले महापुरुष अशा सगळ्या गोष्टींचा विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक आणि उत्साहात साजरा होणारा हा गणेशोत्सव हा महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करताना आम्हाला आनंद होतो आहे, असेही यावेळी निवेदनाच्या माध्यमातून विधानसभेत जाहिर केला.

------------

### आठवा वेतन आयोग लागू झाल्यास

आठव्या वेतन आयोगानुसार बदलणाऱ्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी जानेवारी २०२६ पासून होणे अपेक्षित आहे. मात्र, त्यासाठी वेतन आयोगाचा अहवाल तयार होण्याची गरज आहे. त्यानंतर वेतन आयोगाचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवला जाईल. त्यानंतर केंद्र सरकारकडून त्याला मंजुरी मिळणं अपेक्षित आहे. केंद्र सरकारने सध्या फक्त आठव्या वेतन आयोगाची घोषणा केली आहे. आयोगाचे नेतृत्व कोण करणार किंवा कोणत्या अटी असतील यासंदर्भातील निर्णय घेण्यात आलेले नाहीत. यापूर्वीच्या वेतन आयोगांच्या अंमलबजावणीचा विचार केला असता सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर एकूण पगार आणि भत्त्यांमध्ये जवळपास ५४ टक्के वाढ झाली होती. त्यानंतर सातव्या वेतन आयोगात मूळ वेतनात १४.३ टक्के वाढ झाली होती. तर, पहिल्या वर्षी इतर भत्त्यांमध्ये २३ टक्के वाढ झाली होती. आता आठव्या वेतन आयोगात पगार किती वाढणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. केंद्र सरकारकडून कर्मचाऱ्यांना पगार देताना विविध गोष्टींचा विचार केला जातो. त्यामध्ये मूळ वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता आणि इतर लाभांचा समावेश असतो. काही वर्षांपूर्वी मूळ वेतन ६५ टक्क्यांवरुन ५० टक्क्यांपर्यंत आणले गेले आणि इतर भत्त्यांमध्ये वाढ करण्यात आली. पेन्शन धारकांना केवळ घरभाडे भत्ता आणि प्रवास भत्ता दिला जात नाही.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ११ जुलै २०२५



## नागनाथ विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

बीडः- तालुक्यातील मोरगाव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरूपोर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डी.बी. माटे हे होते.आदर्श शिक्षण संस्थेचे नागनाथ माध्य.व उच्च माध्य.विद्यालय मोरगांव ता.जि.बीड येथे गुरूपोर्णिमेनिमित्त शाळेचे मुख्याध्यापक माटे डी.बी. व पर्यवेक्षक वाणी बी.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक माटे डी.बी. यांनी उपस्थितांना गुरूपौर्णिमेचे महत्व सांगून गुरुचे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील दिशा आणि मार्गदर्शन यावर प्रकाश टाकला. यावेळी विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची अफाट क्षमता - डॉ. ओमप्रकाश शेटे

दिंद्रुड । प्रतिनिधी

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची अफाट क्षमता असल्याचे प्रतिपादन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. देवदूत प्रतिष्ठान, दिंद्रुड यांच्या वतीने नीट (छएएढ) परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच पार पडला, यावेळी ते बोलत होते. ग्रामीण भागात राहूनही शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करणाऱ्या २० गुणवंत विद्यार्थ्यांचा व जलसंपदा विभागात निवड झालेल्या शेतकऱ्याच्या मुलीचा तसेच एमबीबीएस शिक्षण पूर्ण झालेल्या दोन डॉक्टरांचा पालकांसह यावेळी सत्कार करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्यंकटेश चामनर, डॉ. प्रा. रमेश गटकळ, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, नगरसेवक बालाजी चव्हाण, सुभाष सोळंके, संजीवनी राऊत, सरपंच भगवान कांदे, उत्तरेश्वर खताळ, बद्रीनाथ व्हरकटे, सुहास लंगडे आदि मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी केले. तर विद्यार्थ्यांच्या वतीने कु. प्रियंका गौंडर हिने मनोगत व्यक्त करत आपल्या यशामागे असलेल्या शिक्षकांचे, पालकांचे व समाजाचे योगदान अधोरेखित केले. डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, या विद्यार्थ्यांनी ग्रामीण



### देवदूत प्रतिष्ठानतर्फे भावी डॉक्टरांचा गौरव समारंभ

भागात राहूनही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यश मिळवले आहे, हे अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशामधून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये छएएढ सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची अफाट क्षमता आहे, गरज आहे ती योग्य मार्गदर्शन व संधीची. पालक प्रतिनिधी म्हणून डॉ. विष्णू तिडके यांनी भावना व्यक्त करत, अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते असे मत मांडले. यावेळी मंगेश शिवाजी हंगरगे, अक्षय रमेश काटकर, चि.शिवानंद विष्णू तिडके, कु.प्रणिता संतोष शिंदे, चि.करण नामदेव वणवे, कु.योगिनी युवराज ठोंबरे, चि.जयंत अशोक काशीद, कु.ऐश्वर्या वैजनाथ कोथिंबिरे, चि.राहुल मारोती देशमुख, शिरसे प्रतिभा चंद्रकांत, उमेश मुकाराम ठोंबरे, कु.साक्षी मनोहर देशमाने, चि.दिग्विजय बंडूजी खांडेकर, कु.जयश्री लक्ष्मण कुकडे, कु.अनुराधा गणेश ठोंबरे, कु.प्रीती अर्जुन काटे, चि.आदित्य अनिल खडके, कु.राधा राम सोनूळे, चि.ओंकार सतीश कांदे यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला.नीट परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्व भावी डॉक्टरांना शाल, श्रीफळ, पुष्पहार व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवदूत प्रतिष्ठानचे सचिव शिवाजी हंगरगे, नागेश कानडे, गणेश काटकर, बाबा कांबळे, रंगनाथ सोळंके, एकनाथ हंगरगे, बालाजी काचगुंडे, ज्ञानेश्वर ठोंबरे, आदींनी मेहनत घेतली. देवदूत प्रतिष्ठान हे संस्थात्मक पातळीवर आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असून, अशा उपक्रमातून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे कार्य प्रतिष्ठान करीत असल्याचे गौरवोद्गार उपस्थित मान्यवरांनी काढले.

## गुरुपौर्णिमा उत्सव शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालयात आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा

बीड । प्रतिनिधी

शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय विवेकवर्धिनी गुरुकुलामध्ये आज गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पालक भेट आयोजित करण्यात आली होती. गुरुकुलाची गुरुपौर्णिमा व पालक भेट हे वैशिष्ट्यपूर्ण असते. सर्व विद्यार्थ्यांचे आई-वडील या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर , मुख्याध्यापिका सौ .अर्चना जानोळे व पालक प्रतिनिधी म्हणून श्री . इंदुरे अशोक व सौ .अर्चना राजगुरू यांच्या हस्ते ग्रंथाचे पूजन करण्यात आले .

ग्रंथ पूजनानंतर सर्व शिक्षकांचे पूजन वर्गप्रमुख विद्यार्थ्यांनी केले .अत्यंत भक्तीमय व प्रसन्न वातावरण यावेळी होते. पालकांचे पूजन हा आगळावेगळा कार्यक्रम त्यानंतर घेण्यात आला. पालकांना खुर्चीवर



बसवून विद्यार्थ्यांनी वर्गशः आपापल्या आईवडिलांचे पूजन करून दर्शन घेतले व आशीर्वाद घेतला. अत्यंत भावनिक वातावरण यावेळी होते .स्पीकरवर आई-वडिलांची महती सांगणारे गीते लावलेली होती.शिक्षकांचा परिचय श्री . भैय्या सर यांनी करून दिला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री .अतुल कुलकर्णी सर यांनी केले. गुरुकुलाचे पालक श्री संतोष जी कांबळे यांचा आज वाढदिवस असल्यामुळे त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.श्री .इंदुरे यांनी मुलाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले .सौ .अर्चना राजगुरू यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून त्यांच्या मुलांमध्ये दिसणारे बदल सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना डॉ .दत्ता नलावडे सर यांनी वर्षभराचे नियोजन पालकांना सांगितले .पालकांकडून कोणकोणत्या अपेक्षा आहेत पालकांनी कसे वर्तन ठेवावे याबद्दल मार्गदर्शन केले.आभार प्रदर्शन श्री . भैय्या सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. विश्वप्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला .

## विज्ञान शिक्षक,युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षण शिबीराचा समारोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठी विज्ञान परिषद, पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र, योगेश्वरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण कार्य शाळा, शनिवारी विज्ञानवारी अंतर्गत युवा विज्ञान प्रसारक प्रशिक्षणाचा रविवारी समारोप करण्यात आला.

अध्यक्षस्थानी म.वि. परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे सचिव प्रा. भीमाशंकर शेटे होते. मंचावर म.वि.परिषद मुंबईचे पदाधिकारी प्रकाश मोडक,अभय यावलकर,मनस्विनी प्रकल्पच्या प्रा.अरुंधती पाटील,प्रा.अनिल नरसिंगे होते.

यावेळी बोलताना प्रकाश मोडक यांनी सांगितले की, मराठी विज्ञान परिषद ही विज्ञानाच्या प्रसार व प्रचाराचे काम करते शनिवारी विज्ञानवारीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन विज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावे जेणे करून विज्ञान त्यांच्या जगण्यात येऊन त्याचा प्रचार,प्रसार वेगाने होईल.अभय यावलकर म्हणाले की,चांगले पेरले तर चांगले उगवते तसे विज्ञान विषयाचे काम आहे.प्रत्येक गोष्टीत विज्ञान आहे पण ते विद्यार्थ्यांनी चिकित्सक पद्धतीने पाहून त्याचा संशोधक वृत्तीने अभ्यास करणे गरजेचे आहे.अरुंधती पाटील यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणा साठी परिश्रम घेणाऱ्यांचे स्वागत करण्यात आले.पू.बाबासाहेब परांजपे यांच्या मार्गदर्शनातून योगेश्वरी विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झाली आणि ग्रामीण भागात विज्ञानाचा प्रसार प्रचार होऊ लागला विद्यार्थी शिकु लागले. विज्ञान विषयाची गोडी निर्माण करण्याची निकड लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी विद्यालयात शनिवारी विज्ञान वारी अंतर्गत अध्यापन करावे असे मत अध्यक्षीय समारोपात प्रा.भीमाशंकर शेटे यांनी केले.प्रशिक्षण घेतलेले

युवा विज्ञान प्रसारक हे जानेवारी २०२६ पर्यंत विविध विद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे अध्यापन करणार आहेत.

संचालन आदित्य कदम तर आभार हेमंत धानोरकर यांनी मानले.


# मृत घोषित केलेले बाळ झाले जिवंत

### स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील धक्कादायक प्रकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कमी दिवसात,कमी वजनाचे जन्मलेले बाळ जन्मा नंतर कसलीही हालचाल करत नसल्याचे पाहून डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.व ते नातेवाईकांकडे सुपूर्द केले. त्याच्या अंत्यसंस्काराची तयारी सुरू असतानाच ते बाळ अचानक हालचाल करत रडू लागले.नातेवाईकांनी ते बाळ पुन्हा डॉक्टरांकडे नेले. त्या बाळावर आता रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा धक्कादायक प्रकार मंगळवारी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उघडकीस आला.

केज तालुक्यातील होळ येथील महिला प्रसूती साठी सोमवारी रात्री अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल झाली. रात्री त्या महिलेची प्रसूतीही झाली.महिलेने मुलाला जन्म दिला. मात्र हे जन्मलेले मुल बेशुद्ध स्थितीत, व कसलीही हलचाल करत नव्हते. कमी दिवसाचे व कमी वजनाचे बाळ



निदर्शनास आल्याने डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. व ते बाळ नातेवाईकांकडे सोपवले. आता या बाळावर अंत्यसंस्कार करावे लागतील. याच्या प्रक्रियेत असतानाच अचानकच त्या बाळाची हालचाल सुरू झाली. व ते बाळ रडू लागले. नातेवाईकांनी तत्काळ त्या बाळास डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी त्या बाळास ताब्यात घेऊन त्याच्यावर रुग्णालयात सुरू केले. डॉक्टरांच्या हलगर्जी पणामुळे व निष्काळजी पणामुळे हा भीषण प्रसंग उद्भवला असल्याने रुग्णालयात या धक्कादायक प्रकाराने संताप व्यक्त होत आहे.

महिलेने पाहिल्याने वाचले प्राण.....

डॉक्टरांनी मयत समजून बाळ नातेवाईकांकडे दिले. नातेवाईकही ते बाळ घेऊन अंत्यस्कारासाठी होळ येथे पोहोचले. मात्र ते बाळ एका वृद्ध महिलेने उघडून पाहिले असता त्या महिलेस त्या बाळाची हालचाल जाणवली. त्यानंतर त्याला कुशीत घेताच बाळ रडले. अन् ते जीवंत असल्याचे निदर्शनास येताच सर्वांच्या चेहऱ्यावर आश्चर्य निर्माण झाले. आणी नातेवाईकांनी ते बाळ पुन्हा डॉक्टरांकडे नेले.

**जन्मलेले बाळ प्रसूतीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच जन्माला आले.त्याचे वजन. केवळ ९०० ग्राम आहे. जन्मानंतर त्याची कसलीही हालचाल नव्हती. त्यामुळे असा प्रकार घडला असावा. आता त्या बाळावर उपचार सुरू आहेत.**

**डॉ.गणेश तोडगे, स्त्रीरोग,व प्रसूती विभाग प्रमुख, स्वा. रा .ती.रुग्णालय,अंबाजोगाई.**

**विभाग प्रमुखांकडून घटनेचा अहवाल तत्काळ मागवला आहे. हा प्रकार नेमक्या कोणत्या कारणामुळे उद्भवला. याच्या चौकशी साठी पाच जणांची समिती नेमली आहे. ही समिती चौकशी करून आपला अहवाल देईल. त्यानंतर दोषी असलेल्यांवर कारवाई केली जाईल.**

**डॉ. राजेश कचरे,**
**प्रभारी**
**अधिष्ठाता,स्वा.रा.ती.रुग्णालय,अंबाजोगाई.**

# ब्राह्मण समाजातील सर्वांना परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून प्रगती साधता येईल - कॅप्टन आशिष दामले

### पेशवा प्रतिष्ठान चा गुणवंत कौतुक सन्मान सोहळा थाटात संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पेशवा प्रतिष्ठान आयोजित गुणवंत कौतुक सन्मान सोहळा रविवारी दि. ६ जुलै रोजी अत्यंत उत्साहात आणि सन्मानपूर्वक पार पडला.परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनातून ब्राह्मण समाजातील प्रत्येकाने प्रगती साधावी असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन अशी दामले यांनी केली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिरीष पांडे , दीपक रणनवरे, जितेंद्र कुलकर्णी, स्मिता धावडकर, चंद्रकांत मुळे, विठ्ठल



देशपांडे, धनंजय कुलकर्णी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना दामले म्हणाले की, येणाऱ्या काळात ब्राह्मण समाजातील प्रत्येकाला तीन लाख कर्ज तेही सुलभ पद्धतीने मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.तसेच उद्योग करण्यासाठी दहा लाखापर्यंतचे वैयक्तिक कर्ज व सामूहिक उद्योगा साठी ५० लाखापर्यंत कर्ज मिळणार असल्याचे सांगितले.

समाजातील दहावी, बारावी तसेच पदवी व स्पर्धा परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या जवळपास ६२ गुणवंतांचा यावेळी गौरव करण्यात आला. यावेळी जवळगाव येथील शेतकरी विठ्ठल व्यंकटराव देशपांडे यांना कृषिभूषण पुरस्काराने तर शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल चंद्रकांत



अनंतराव मुळे यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच पेशवा प्रतिष्ठान तर्फे एका होतकरू विद्यार्थ्यास उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी शैक्षणिक मदत म्हणून पन्नास हजार रू चा धनादेश मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

आपल्या भाषणात दीपक रननवरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी केवळ गुणांसाठी नव्हे तर ज्ञानासाठी शिक्षण घ्यावे. समाजासाठी योगदान देणारे सुशिक्षित आणि सजग नागरिक घडवणे ही आपली जबाबदारी आहे.'' जितेंद्र कुलकर्णी म्हणाले की , नवयुवकांनी नोकरीच्या मागे न लागता बॉंड मार्फत उद्योगाकडे वळावे. अध्यक्षीय भाषणात शिरीष पांडे यांनी पेशवा प्रतिष्ठानच्या विविध कार्यक्रमाचे कौतुक करताना राखलेले सातत्य अतिशय कौतुकास्पद असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ महेश अकोलकर यांनी प्रतिष्ठानची भूमिका मांडली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ ममता दीक्षित यांनी केले, तर आभार प्रदर्शन केदार दामोशन यांनी मानले. प्रतीक्षा जोशी व ज्योत्स्ना लाटकर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.कार्यक्रमाला समाजबांधव, प्रतिष्ठान चे पदाधिकारी पालक, विद्यार्थी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठान चे पुरुष , महिला पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### वडवणी तहसील कार्यालयावर

घोषणाबाजी केली व गायरान आमच्या हक्काचे नाही कोणाचे बापाचे घोषणा दिल्या यावेळी तहसीलदार यांना किती मागणीचे निवेदन देण्यात आले यावेळी आक्रोश मोर्चात वडवणी तालुका अध्यक्ष महादेव आवाड,वडवणी ग्रामपंचायतचे माजी सदस्य परमेश्वर उजगरे,बाजार समिती संचालक बबनराव मांजरे,माजी सरपंच अरुणराव आवाड, लक्ष्मण आवाड,मंगेश शिंदे यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी आक्रोश मोर्चा आंदोलनात वडवणी तालुक्यातील दलित गायरान धारक पुरूष, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### संपादीत जमिनीचा थकीत

केलेल्या प्रकरणात सुमारे ३० लाख रुपयांच्या वाढीव मावेजा बाबत प्रकरण दाखल केले होते.हे २०१६ मधील भुसंपादन प्रकरणाशी संबंधित असून, शासनाने अद्याप ते अंमलात आणले नव्हते.या दोन्ही प्रकरणांत संबंधित सरकारी अधिकारी यांच्या वतीने दोन्ही प्रकरणास विरोध करण्यात आला. जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे प्रशासकीय प्रमुख असून केवळ कार्यवाही करणारे असल्याचे कारण पुढे करण्यात आले. मात्र न्यायालयाने या सर्व युक्तिवाद फेटाळून लावत अर्ज मंजूर केले. न्यायनिर्णय प्राप्त जिल्हाधिकारी यांच्या वतीने स्थगिती मिळवण्याचा प्रयत्न केला असला तरी प्रत्यक्षात कोणतीही स्थगिती मिळालेली नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.विशेष म्हणजे,या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने रिट याचिकांमधून स्पष्ट निर्देश दिले होते की,संबंधित शासकीय मालमत्तांवर तात्काळ जप्ती आणून ती विक्री करून तीन महिन्यांच्या आत या प्रकरणातील वादीनां रक्कम वितरित करण्यात यावी.यावर आधारितच माजलगाव येथील दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर) स.स. बुद्रूक यांनी दि २ जुलै रोजी दोन्ही अर्जावरील निर्णय देताना विशेष बेलिफ कक्षामार्फत मालमत्ता जप्तीची कार्यवाही सुरू करण्याचे आदेश दिले होते.उच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी वेळेत व्हावी, यासाठी ही कठोर कारवाई केल्याचे नमूद करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील २० खुर्ची,२० कपाट, संगणक,बॅटरी व इन्व्हर्टर व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

### पाटोद्यात तहसीलच्या

नाराजी व्यक्त करताना प्रश्न उपस्थित केला आहे की, या जाहिरातींचा खर्च कोणाच्या खिशात गेला? तसेच, या जाहिरातींमुळे जनतेपर्यंत माहिती पोहोचण्याऐवजी फक्त कागदांचा अपव्यय झाला आहे का, असा संशय व्यक्त केला जात आहे.या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागण्यात आले असून, याबाबत तपास होणे आवश्यक असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### विद्यार्थ्यांनो शैक्षणिक साहित्य

शिक्षणासाठी वापर करतील. तर शिवसेना जिल्हा प्रमुख यांनी मत व्यक्त करताना सांगितले की सीमा ओस्तवालआणि त्यांचे प्रयास फौंडेशन विदयार्थ्यांच्या जीवनात वेगळा आनंद शैक्षणिक साहित्य देऊन निर्माण करतात. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शोभा कदम यांनी केले तर आभार व प्रास्ताविक केंद्र प्रमुख मनियार हकीम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले,

### गुरु शिवाय जिवन व्यर्थ आहे

पौळ, उमेश भोसले, शिवाजी ढोबळे, महादेव बिचकुले, जयदिप गोल्हार, संतोष सोळुंके, माऊली पांगरे , नंदकुमार पौळ, विठ्ठल घुगे, सखाराम गिरी, गोपाल गिरी यांच्या सह पंचक्रोशीतील भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना दत्ता महाराज यांनी सांगितले की सध्या पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.तरी प्रत्येकाने आपल्या परिसरात एक तरी झाड लावुन त्यांचे संवर्धन केले पाहिजे. यामुळे निसर्गाचा समतोल राहील. तसेच आपल्या आई वडिलांची सेवा करुन त्यांची काळजी घ्या असा मौलिक सल्ला ही यावेळी शेवटी बोलताना दिला. तर गुरुपौर्णिमेनिमित्त महंत दत्ता महाराज गिरी यांचे गुरुपुजन झाले. या नंतर दामोधर भोसले, उमेश भोसले, कैलास भोसले, महादेव बिचकुले, लक्ष्मण नाथा कोकरे, वैजीनाथ रोमन या भक्त मंडळीच्या वतिने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील तसेच गोरी येथील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### गेवराई तहसील कार्यालयासमोर

रुपये ठेवीच्या नियमाचे उल्लंघन करत रोख रकमेतून पैसे स्वीकारले गेले. लिलावादरम्यानचे संगनमत तहसील कार्यालयाच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहे.सय्यद एजाज यांनी तात्काळ चौकशी समिती स्थापन करून तहसीलदारांना निलंबित करण्याची मागणी केली आहे. तसेच, गैरप्रकाराने झालेला लिलाव रद्द करून उपविभागीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पुन्हा लिलाव घ्यावा, अशी मागणी केली आहे. या आमरण उपोषणाला लोकनेते बाळराजे पवार,युवा नेते शिवसेना यशराज पंडित, माजी नगराध्यक्ष ब्रम्हादेव धुरंधरे, माजी उप नगराध्यक्ष दादासाहेब गिरी,शिवसना तालुका प्रमुख अजय दाभाडे, नगरसेवक जानमोहमंद बागवान,मोमीन मोअज्जम, सय्यद बदियोद्दीन शिवसना शहरप्रमुख शेख शहेदाद, जुनेद बागवान, बाळासाहेब गायकवाड ,राजू शेख,सादेक चाचु,खदीर बागवान,धम्मापाल कांडेकर,मुश्ताक कुरैशी, शौकत पठाण ,शेख नईम ,अतीक पठाण यांच्यासह अनेकांचा पाठिंबा मिळाला आहे.या घोटाळ्याने गेवराईत तीव्र असंतोष पसरला असून, नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात रोष वाढत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अद्याप कोणतेही निवेदन आलेले नाही. सय्यद एजाज यांनी मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रशासन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गुरु पौर्णिमेपासून धम्मप्रवचन

गुरुवार रोजी जिल्हा शाखा बीड पुर्वच्या वतीने राबवण्यात येत आसलेल्या विषय मालीकातील गुरु पौर्णीमा व वर्षावासाचे महत्व या विषयाने सुरवात होत आहे.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन जि.संस्कार उपाध्यक्ष बीड पुर्वचे एस.बी.मोरेमहिला जिल्हाध्यक्षा कमलताई डोंगरे,जिल्हापर्यटन सचिव के व्ही साळवे आहेत तर कार्यक्रमाच्या उदघाटक म्हणुन भारतीय बौद्ध महासभेच्या महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे,तर अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे आहेत तर या कार्यक्रमासाठी भारतीय बोद्ध महासभेचे तालुका,शहर ,व ग्रामीण पदाधिकारी तसेच धम्म उपासक उपासिकांनी उपस्थीत राहावे आसे अवाहन तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे व संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले आहे.

### मानवी हक्क अभियान

महामंडळ, मौलाना अब्दुल कलाम महामंडळ या सर्व महामंडळांना भरीव निधी उपलब्ध करावा व कर्जवाटप तात्काळ करण्यात यावेत, राज्यातील अनुसूचित जातीच्या आरक्षण मध्ये अ, ब, क,ड अशी वर्गवारी करून ते तातडीने लागू करावेत, वडवणी तालुक्यातील मौजे साळींबा व उपळी या गावांसह जिल्हाभरातील वहिती असलेल्या गायरान जमिनीवर होणारे शासनाचे प्रकल्प रोखण्यात यावेत, पंतप्रधान घरकुल योजना व रमाई घरकुल योजनेचे अर्थसहाय्य पाच लाख रुपये प्रति घरकुल करण्यात यावे, प्रत्येक गावात दलितांसाठी मजबूत स्मशानभूमी बांधून देण्यात यावी, शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती वाढ करून ती वेळेवर वाटप करण्यात यावे, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी, सन १९८९ सालच्या गोदावरी नदीतील पूरग्रस्तांना पूरग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे आदी मागण्यासाठी १४ जुलै रोजी माजलगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपविभागीय कार्यालय दरम्यान भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजलगाव तालुका अध्यक्ष मधुकर कांबळे, वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले यांच्यासह जिल्ह्यातील बहुसंख्य मानवी हक्क अभियान चे पदाधिकारी यांच्या नेतृत्वात या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून माजलगाव तालुक्यातील गायरान धारक शेतकरी, मागासवर्गीय जनतेने या मोर्चात सामील होण्याची आवाहन निमंत्रक रमेश गवळी व अक्षय गवळी यांनी माध्यमांद्वारे केले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि. ११ जुलै २०२५



# कृषी पदवीधरांनी शेतीकडे पाठ फिरविणे चिंतेचे : चंद्रकांत पाटील

पुणे : ''शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने कृषी महाविद्यालयांत गुंतवणूक केली आहे, मात्र हा अभ्यासक्रम स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त असल्याने त्या तयारीसाठी विद्यार्थी कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतात. येथून पदवी घेतलेली मुले-मुली शेतीकडे जात नाहीत, हा चिंतेचा विषय आहे,' असे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले.

'शाश्वत कृषी संजीवनी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. सर अल्बर्ट हावर्ड यांच्या मूळ पुस्तकाचा अनिल व्यास यांनी मराठीत अनुवाद केला आहे. याप्रसंगी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, आणंद कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मदनगोपाल वार्ष्णेय, भारतीय किसान संघाच्या प्रांत उपाध्यक्ष स्नेहलता सावंत, सेवावर्धिनीचे कार्यवाह सोमदत्त पटवर्धन, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे उपस्थित होते. पाटील म्हणाले, ''कृषी महाविद्यालयात मुलींची वाढलेली संख्या सुखावह आहे. देशाच्या आर्थिक विकासात शेतीचा सर्वाधिक वाटा आहे. गेल्या काही वर्षांत मात्र रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीचा कस कमी होत आहे. तो वाढविण्यासाठी शास्त्रशुद्ध नैसर्गिक शेतीची गरज आहे.'' डॉ. कुलकर्णी म्हणाल्या, ''आज सगळीकडे प्लॉटिंग झालेले आणि डोंगर पोखरलेले दिसतात. त्यामुळे शेतजमिनीचा आता 'बिगर कृषी' (एनए) वापर करणे बंद व्हायला हवे, अन्यथा भारत हा कृषिप्रधान देश होता, असे म्हणण्याची वेळ येईल.'' प्राचार्य डॉ. महानंद माने यांनी स्वागत केले. डॉ. सुश्मिता नांदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जनार्दन कदम यांनी आभार मानले. खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''बहुसांस्कृतिकतेने नटलेल्या देशात नियमांची अंमलबजावणी करणे अवघड आहे. देशाला एक भाषाही चालत नाही, हे दुर्दैव आहे. शेतीला मात्र एका सूत्रामध्ये आणून ठेवावे लागेल.''




## वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारणीची सोपी आणि प्रभावी पद्धत



शेतावर वेलवर्गीय भाजीपाला पिकांना योग्य आधार देण्यासाठी मंडप उभारणे एक उत्तम उपाय आहे. मंडप वेलवर्गीय पिकांना हवामानातील बदल, जास्त पाऊस, किंवा मजबूत वाऱ्यापासून संरक्षण देतो आणि त्यांना वाढण्यासाठी एक मजबूत आधार प्रदान करतो. योग्य पद्धतीने उभारलेला मंडप पिकांना हवामानाची प्रतिकूल परिस्थिती टाळण्यासाठी आणि त्यांचा विकास योग्य प्रकारे होण्यासाठी खूप मदत करतो. म्हणूनच, आपल्या शेतावर मंडप उभारून आपल्या पिकांना सुरक्षा आणि वाढ देणे एक उत्तम पर्याय आहे.

वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारण्याची पद्धत :

१) लाकडी डांबांची तयारी - शेताच्या सर्व बाजूंनी प्रत्येक ५ ते ६ फूट अंतरावर १० फूट उंच आणि ४० जाड लाकडी डांब (पोल) जमिनीत गाडावेत. डांब २ फूट जमीन गाडून उभे करावेत. हे पिकांना योग्य आधार देतात आणि हवामानातील बदलांपासून त्यांचे संरक्षण करतात.

२) तारे ताणणे - डांबाच्या बाहेरील बाजूस ताणण्यासाठी ८ गेज तारा वापरणे आवश्यक आहे. तारांना १-९.५ फूट लांबीच्या दगडांवर दुहेरी बांधून जमिनीत गाडा. हे तार मजबूतीने ताणले जातात आणि पिकांना अधिक स्थिरता मिळते.

३) यू आकाराचे खिळे ठोकणे - तारे घसरू नयेत यासाठी, डांबावर यू आकाराचे खिळे ठोकून तारा पक्की करावी. यामुळे तार ताणलेल्या स्थितीत राहतील आणि पिकांच्या संरक्षणासाठी अधिक सुरक्षित असतील.

४) पिळाची तारे ताणणे - त्यानंतर, १६ गेज तारे प्रत्येक २ फूट अंतरावर ताणलेल्या तारेवर पसराव्यात. यामुळे मंडप अधिक मजबूत होईल आणि वेलवर्गीय पिकांना सुरक्षा मिळेल. वेलवर्गीय पिकांसाठी मंडप उभारण्याचे फायदे : हवामानाचे संरक्षण - मंडप पिकांना जास्त पावसापासून, उन्हाच्या तीव्रतेपासून आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवतो. उत्पादन वाढवणे - मंडपामुळे पिकांना अधिक स्थिरता मिळते आणि त्यांना योग्य वातावरण मिळवून उत्पादन वाढते. आधार मिळवणे - पिकांना ताणलेले तारे योग्य आधार देतात, ज्यामुळे वाऱ्याने किंवा इतर कारणांमुळे पिकांचे नुकसान होणार नाही.जलद स्थापना - मंडप उभारणीची प्रक्रिया साधी आणि जलद आहे. पिकांसाठी योग्य संरचना तयार होण्यास वेळ लागत नाही.

## खास तंत्र वापरून अशी फूलवा फळबाग

फळबागेच्या उत्तम वाढीसाठी योग्य खत व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. विद्राव्य खतांचा ठिबक सिंचनाद्वारे वापर (फर्टिगेशन) ही अत्यंत प्रभावी आणि आधुनिक शेतीसाठी उपयुक्त पद्धत आहे. यामुळे झाडांना गरजेप्रमाणे अन्नद्रव्ये मिळतात, खतांचा कार्यक्षम वापर होतो आणि पिकांची गुणवत्ता सुधारते.

फळबागेच्या निरोगी वाढीसाठी विद्राव्य खतांचा ठिबक सिंचनाद्वारे वापर (फर्टिगेशन) हा सर्वोत्तम पर्याय आहे. यामुळे झाडांना योग्य प्रमाणात अन्नद्रव्ये मिळतात, पाण्याचा अपव्यय टाळता येतो आणि फळांचे उत्पादन व गुणवत्ता वाढते.

विद्राव्य खत म्हणजे काय?

विद्राव्य खते म्हणजे पाण्यात सहज विरघळणारी खते, जी झाडांना ठिबक सिंचनाद्वारे दिली जातात. यामुळे अन्नद्रव्यांचा योग्य तो पुरवठा होऊन झाडांची चांगली वाढ होते. विद्राव्य खतांचा वापर केल्याने खतांची बचत होते आणि उत्पादनात वाढ होते.

फर्टिगेशन प्रणालीचा वापर : फर्टिगेशन ही ठिबक सिंचन प्रणालीतून विद्राव्य खत पुरवठा करण्याची आधुनिक पद्धत आहे. यामुळे अन्नद्रव्यांचा ८०-९०% परिणामकारक वापर होतो, ज्यामुळे उत्पादन वाढते आणि गुणवत्ताही सुधारते.

शेणखत व कंपोस्टचा पूरक उपयोग : ३-४ वर्षांच्या झाडांसाठी वर्षातून दोन वेळा (डिसेंबर-जानेवारी किंवा मे-जून) १०-४० किलो शेणखत किंवा कंपोस्ट प्रति झाड वापरावे. त्यापेक्षा जास्त वयाच्या झाडांसाठी बहारानुसार ५० किलो शेणखत प्रति झाड द्यावे. निंबोळी पेंड प्रति झाड १ किलो दरवर्षी वापरणे उपयुक्त ठरते.

दैनिक पाणी व्यवस्थापन : ठिबक सिंचनाद्वारे झाडांना गरजेपुरतेच पाणी मिळते, त्यामुळे अति पाण्याचा वापर टाळता येतो आणि मुळांपर्यंत अन्नद्रव्ये सहज पोहोचतात.

योग्य प्रमाणात अन्नद्रव्ये दिल्यास मुळे मजबूत होतात आणि झाडाच्या वाढीला चालना मिळते.

हवामान आणि जमिनीच्या गुणवत्तेनुसार खत व्यवस्थापन : अन्नद्रव्यांची उपलब्धता ही जमिनीच्या तापमान, ओलावा, हवामानातील बदल, सामू, चुनखडीचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब यावर अवलंबून असते. योग्य प्रमाणात विद्राव्य खतांचा वापर केल्याने झाडांना सर्व पोषकतत्व योग्य वेळी मिळतात.

फळबागेमध्ये विद्राव्य खतांच्या वापराचे फायदे : विद्राव्य खते झाडांच्या गरजेनुसार दिल्याने अन्नद्रव्यांचा संतुलित पुरवठा होतो. ठिबक सिंचनाद्वारे अन्नद्रव्ये दिल्याने पाण्याचा अपव्यय कमी होतो.

सेंद्रिय पदार्थ आणि विद्राव्य खते यांचा एकत्रित वापर केल्याने जमिनीतील सूक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते आणि मातीची गुणवत्ता सुधारते.खतांचा योग्य वापर केल्यास झाडांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि फळांचा आकार, रंग आणि चव सुधारते. विद्राव्य खतांचा नियंत्रित वापर केल्यास जमिनीतील नायट्रोजन आणि फॉस्फरस यांचे प्रमाण संतुलित राहते आणि जमिनीची ऱ्हास प्रक्रिया थांबते.



## कमी खर्चात करा या ५ झाडांची बाग, काही वर्षात बनणार करोडपती!

पारंपारिक शेतीत सातत्याने कमी होत असलेल्या नफ्यामुळे शेतकरी आता नवीन प्रकारची पिके आणि फळबाग लागवडीकडे वळू लागले आहेत. फलोत्पादनातील असाच एक फायदेशीर पर्याय म्हणजे वृक्ष लागवड. वास्तविक पिकांच्या चांगल्या उत्पन्नासोबतच काही झाडे अशी आहेत जी तुम्हाला श्रीमंत बनवू शकतात. या झाडांची एक-दोन वर्षे काळजी घेण्याशिवाय तुम्हाला बागकामात जास्त मेहनत घेण्याची गरज नाही. ही झाडे केवळ लाकडाच्या बाबतीत चढ्या भावाने विकली जात नाहीत, तर यातील अनेक झाडांची फळे, पाने, साल, मुळे इत्यादींचीही चढ्या दराने विक्री होते. अशा ५ झाडांबद्दल जाणून घेऊया ज्याची लागवड करून आपण चांगले उत्पन्न मिळवू शकतो.

शीशमचे झाड : शीशम वृक्षाचे लाकूड खूप महाग आहे कारण या झाडाचे लाकूड मजबूत आहे. शीशम वृक्षाच्या लाकडाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते दीमकांपासून मुक्त आहे. त्यामुळे त्याचे लाकूड फर्निचर, दरवाजे, इलेक्ट्रिकल बोर्ड, खिडकीच्या चौकटी आणि ट्रेनचे डबे इत्यादी वस्तू बनवण्यासाठी वापरले जाते. याच्या लाकडापासून बनवलेल्या वस्तू चढ्या भावाने विकल्या जातात. वालुकामय जमीन गुलाबाच्या लागवडीसाठी चांगली मानली जाते आणि पावसाची आवश्यकता असते कारण ओलसर जमीन गुलाबाच्या झाडासाठी



सर्वोत्तम मानली जाते.

चिनार झाड : लोकप्रिय लागवडीतून शेतकरी बंपर उत्पन्न मिळवू शकतात. चिनाराच्या झाडांची लाकूड ७०० ते ८०० रुपये प्रति क्विंटल दराने विकली जाते. चिनाराच्या झाडाचे लाकूड खूप हलके असते, त्यामुळे हलक्या वस्तू बनवण्यासाठी ते खूप उपयुक्त आहे. लाकडी सजावटीच्या वस्तू, कागद आणि मॅचस्टिक्स बनवण्यासाठी लोकप्रिय लाकडाचा वापर केला जातो. याशिवाय क्रिकेटची बॅट, विकेट, कॅरम बोर्ड, कॅरम बोर्डाचे तुकडे आणि चॉप स्टिक्स इत्यादी बनवल्या जातात. चिनार झाडांची योग्य काळजी घेतल्यास एका हेक्टरमध्ये २५० झाडे उगवता येतात. त्याचबरोबर एक हेक्टरच्या लोकप्रिय लागवडीतून सहा ते सात लाख रुपये उत्पन्न मिळू शकते.

सागवान झाड : सागवान लाकूडही खूप महाग विकले जाते. या हंगामात सागवान झाडे लावून शेतकरी चांगला नफा कमवू शकतात. सागाची लागवड करून एक एकर शेतीतून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळवता येते. सागवान हे महागड्या लाकडांपैकी एक आहे. त्यातून फर्निचर बनवले जाते. ते दीर्घकाळ टिकणारे असल्याने बाजारपेठेत त्याची मागणी जास्त आहे. याच्या लागवडीत जोखीम फारच कमी असून नफाही चांगला आहे.

मलबार कडुलिंबाचे झाड :मलबार कडुनिंबाची लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. हे झाड लावल्यानंतर शेतकऱ्यांना लाखो रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. या झाडाच्या लागवडीसाठी जास्त मेहनत करावी लागत नाही. मलबार कडुनिंबाचे लाकूड अनेक कामांसाठी वापरले जाते आणि त्याच्या लाकडाची किंमतही चांगली असते आणि त्याची विक्री करून चांगला नफाही मिळवता येतो.

निलगिरीचे झाड : सफेदा हे एक झाड आहे ज्याला बाजारात चांगली किंमत मिळते. सफेडाला निलगिरी असेही म्हणतात. याच्या लागवडीची खास गोष्ट म्हणजे याची लागवड कोणत्याही हंगामात करता येते. सर्व प्रकारच्या हवामानात याची लागवड करता येते. हे झपाट्याने वाढणारे झाड आहे. याच्या लागवडीतून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो. त्याच्या लाकडापासून फर्निचर, इंधन आणि कागदाचा लगदा तयार केला जातो. ही वनस्पती सुमारे ८ ते १० वर्षात झाड बनते. यानंतर शेतकऱ्यांना यातून १० ते १२ लाख रुपये सहज मिळू शकतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६५९ : अफझलखानाशी मुकाबला करण्यासाठी शिवाजी राजे राजगडवरुन निघून प्रतापगड येथे पोचले.
१८०१ : फ्रेन्च खगोलविद जॉन लुई पॉन याने 'पॉन' धूमकेतूचा शोध लावला.
१८९३ : कोकिची मिकीमोटो यांनी पहिला 'कल्चर्ड' मोती मिळवला.
१९०८ : लोकमान्य टिळकांना मंडालेची ६ वर्षाची शिक्षा झाली.
१९१९ : नेदरलँड देशामध्ये आठ तासांचा दिवस आणि रविवार सुट्टी असा कामगारांसाठी कायदा लागू झाला.
१९२१ : मंगोलियन पीपल्स रिपब्लिक स्थापना.
१९३० : ऑस्ट्रेलियाचे सर डोनाल्ड ब्रॅडमन यांनी इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात एकाच दिवसात विक्रमी नाबाद ३०९ धावा केल्या.
१९५० : पाकिस्तान आंतरराष्ट्रीय नाणेनिधिचा सदस्य बनला.
१९५५ : अमेरिकेने आपल्या चलनावर 'देवावर आमचा विश्वास आहे'असे छापण्याचे ठरवले.
१९६२ : पहिले ट्रान्सअटलांटिक उपग्रह दूरदर्शन प्रसारण झाले.
१९६२ : प्रोजेक्ट अपोलो नासाने चंद्रावर अंतराळवीरांना उतरवण्याचे आणि त्यांना पृथ्वीवर परत आणण्याची घोषणा केली.
१९७१ : चिलितील तांब्याच्या खाणींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९७७ : मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांना प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडमने सन्मानित करण्यात आले.
१९७९ : अमेरिकेची 'स्कायलॅब' ही अंतराळातील प्रयोगशाळा रात्री दहाच्या सुमारास हिंदी महासागरात कोसळली.
१९८९ : जागतिक लोकसंख्या दिन सुरुवात.
१९९४ : दिल्लीच्या पोलिस महानिरीक्षक (तुरुंग) किरण बेदी यांना 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२००१ : आगरताळा ते ढाका या शहरांदरम्यान बससेवा सुरू झाली.
२००६ : मुंबईत उपनगरी गाड्यांमध्ये झालेल्या स्फोटांत २०९ लोक ठार तर ७१४ लोक जखमी झाले.
२०१० : साली स्पेन देशाने नेदरलँड्स फुटबॉल संघाचा पराभव करून फुटबॉल विश्वचषक जिंकला.
२०२१ : रिचर्ड ब्रॅन्सन हे त्याच्या व्हर्जिन गॅलेक्टिक अंतराळयानाद्वारे अंतराळात जाणारे पहिले सामान्य नागरिक बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५७ : भारतीय राजकारणी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे अमरावती येथील अध्यक्ष सी. शंकरन नायर यांचा जन्मदिन.
१८८९ : नारायण हरी आपटे कादंबरीकार, चित्रपट कथालेखक. 'सुखाचा मूलमंत्र', 'पहाटेपुर्वीचा काळोख', 'उमज पडेल तर', 'एकटी' या त्यांच्या काही प्रसिद्ध सामाजिक कादंबर्या होत. 'कुंकू' हा गाजलेला चित्रपट त्यांच्या 'न पटणारी गोष्ट' या कादंबरीवर आधारलेला होता. (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९७१ कोरेगाव, जिल्हा सातारा)
१८९१ : परशुराम कृष्णा गोडे प्राच्यविद्या संशोधक. त्यांनी ४०० विषयांवर संशोधन करुन लिहीलेले निबंध ८ खंडात प्रसिद्ध झाले आहेत. (मृत्यू: २८ मे १९६१)
१९०२ : भारतीय शीख राजकीय नेता व भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेता आणि भारताचे पहिले संरक्षण मंत्री सरदार बलदेव सिंह यांचा जन्मदिन.
१९२१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: ९ एप्रिल २००१)
१९२३ : टुण टुण भारतीय अभिनेत्री आणि कॉमेडियन (निधन: २४ नोव्हेंबर २००३)
१९२७ : थिओडोर हेरॉल्ड मॅमन लेसरचे निर्माते (निधन: ५ मे २००७)
१९३४ : जियोर्जियो अरमानी कंपनीचे स्थापक जियोर्जियो अरमानी यांचा जन्म.
१९५३ : सुरेश प्रभू केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्री, उद्योगमंत्री, ऊर्जामंत्री आणि अवजड उद्योग मंत्री
१९५६ : भारतीय-अमेरिकन लेखक आणि शैक्षणिक अमिताव घोष यांचा जन्म.
१९६० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता कुमार गौरव यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-अमेरिकन कादंबरीकार आणि लघु कथालेखक झुम्पा लाहिरी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६३० : कलकत्ता शहरात आलेली पहिली विदेशी महिला बेगम रेजाबिबेह सुकिएस यांचे निधन.
१९१२ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचे निधन.
१९८९ : सर लॉरेन्स ऑलिव्हिये ब्रिटिश अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता (जन्म: २२ मे १९०७)
१९९४ : रणांगणावरील असामान्य कामगिरीबद्दलचा 'परमवीर चक्र' हा सर्वोच्च सन्मान मिळवणारे मेजर (निवृत्त) रामराव राघोबा राणे यांचे निधन. हा सन्मान मिळवणारे 'बॉम्बे सॅपर्स'चे आणि महाराष्ट्रातील एकमेव अधिकारी होते. (जन्म:)
२००३ : सुहास शिरवळकर कादंबरीकार आणि रहस्यकथालेखक (जन्म: १५ नोव्हेंबर १९४८)
२००३ : पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक, नाटककार आणि अभिनेते भीष्म साहनी यांचे निधन.
२००९ : शांताराम नांदगावकर गीतकार (जन्म: १९ आक्टोबर १९३६)

# नागरिकांना सर्व सुविधा देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध- जिल्हाधिकारी

## परळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर शेतकरी, विद्यार्थी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

शेतकरी , सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी यांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तत्पर व गतिमान पद्धतीने देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. सर्व नागरिक यांनी दर सोमवारी व गुरुवारी दुपारी बारा ते दोन या वेळेत होणाऱ्या जनता दरबारमध्ये आपल्या समस्या रास्तपणे प्रशासनाकडे मांडव्यात, त्यांचे निराकरण तात्काळ करण्यात येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना दिला.




परळी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टोकवाडी येथे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत महसूल विभागाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बालविवाह रोखणे व व्यसनमुक्तीबाबत शपथही नागरिकांना त्यांनी दिली. यावेळी परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार वेंकटेश मुंडे, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, परवीन पठाण, राजाभाऊ ढगे, सरपंच गोदावरी राजाराम मुंडे, माजी पंचायत समिती सभापती पिंटू उर्फ बालाजी मुंडे, श्याम आघाव, डॉक्टर नामदेवा आघाव, डॉक्टर सतीश घुगे, पोलीस निरीक्षक मझर सय्यद, मंडळ अधिकारी अरबी कुमटकर, मंगल मुंडे, नीता कोल्हेवाड, गणेश फड, विस्तार अधिकारी अंभोरे, तालुका कृषी अधिकारी राठोड, अव्वल कारकून बालाजी कचरे व सर्व तलाठी यांची उपस्थिती होती.

शिबिरात वारस फेरफार व सातबारा २१ शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. इतर हक्कात नोंदी दुरुस्त केलेली सातबारा १३ शेतकऱ्यांना सातबारा वितरित केले . शेतरस्ते नोंदी केलेल्या तीन शेतरस्स्ता सातबारा शेतकऱ्यांना व्यतिरिक्त केले . ४० विद्यार्थ्यांना उत्पन्न, रहिवासी ,जातीचे प्रमाणपत्र ,नॉन क्रिमिलियर व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीत वीज पडून मयत झालेल्या जनावरांच्या मौजे दौनापूर व गुट्टेवाडी शेतमालकास शासकीय मदत देण्यात आली. मौजे बोरखेड येथील शेतकरी आत्महत्या कुटुंबास व मौजे सारडगाव येथील वीज पडुन जखमी झालेल्या व्यक्तीस शासकीय अनुदान मदत देण्यात आली . महिला व बाल विकास विभागाकडून चार लाभार्थ्यास बेबी किट वाटप करण्यात आले. तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त मौजे मालेवाडी कुटेवाडी वाघाळा येथील चार कुटुंबीयांना तूर बियाणे मिनी किट वाटप करण्यात आले . मोजणी खात्याकडून गावठाण हद्दीतील १० शेतकऱ्यांना सनद वाटप व नकाशे यांचे वितरण केले. एकूण ९९ शेतकरी व विद्यार्थी यांना विविध लाभाचे वितरण जिल्हाधिकारी जॉन्सन व अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार आघाव यांनी मानले. परळी व पिंपळगाव गाढे या मंडळातील अनेक शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून शाळेत नव्यानेच मान्यता मिळालेल्या आठव्या वर्गाचे उद्घाटनही झाले. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात विविध महिला बचत गटाचे, तसेच महिला व बालविकास विभाग, महसूल विभाग , पंचायत समिती विभागाचे विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्याचबरोबर सामाजिक अर्थसहाय्य योजना व पुरवठा विभागाचे लाभार्थी, शेतकरी फार्मर आयडी व डीबीटी करिता विशेष पथकाचे कॅम्प उभारण्यात आले होते .टोकवाडी येथील समाधान शिबिरानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व महसूल अधिकारी यांच्यासह तालुका क्रीडा संकुल परळी येथील जागेची पाहणी केली. तसेच औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पास भेट दिली . यावेळी त्यांच्यासोबत मुख्य अभियंता सुनील इंगोले व मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे देखील उपस्थित होते . दुपारच्या सत्रात जिल्हाधिकारी यांनी सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांची तालुकास्तरीय आढावा बैठक घेतली. सायंकाळी उशिरापर्यंत धर्मापुरी येथील किल्ला व केदारेश्वर मंदिर तसेच मरळसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर येथे भेट देऊन पुरातत्त्व विभागाचे वतीने चालू असलेल्या कामाची पाहणी करून गावकऱ्यांशी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी संवाद साधला.

---

## राजाभाऊ दहिवाळ यांना परळी शहरातील जनतेकडून भावपूर्ण श्रद्धांजली



परळी। प्रतिनिधी

दीनदयाळ सहकारी बँकेचे माजी संचालक आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते राजाभाऊ दहिवाळ यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त परळी शहरात भावपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला. परळी शहरातील माणिकनगर येथील कल्याणकारी हनुमान मंदिर येथे गीता भक्त ह भ प संपत महाराज गीते गुरुजी याचे कीर्तन संपन्न झाले परिसरात शेकडो नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पक्षाचे पदाधिकारी आणि दहिवाळ काकांचे अनुयायी यांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाची सुरुवात हनुमान मंदिरात विशेष पूजा आणि अभिषेकाने झाली. यानंतर उपस्थितांनी दहिवाळ काकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण करत अनेकांनी भावनिक शब्दांत त्यांच्याविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात भाजपचे स्थानिक पदाधिकारी, बँकेचे माजी व विद्यमान कर्मचारी, तसेच अनेक नागरिकांनी दहिवाळ काकांच्या समाजकार्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी परळी शहरातील विकासासाठी व सामाजिक सलोख्यासाठी दिलेल्या योगदानाचे सर्वांनी कौतुक केले. या प्रसंगी उपस्थित वक्त्यांनी सांगितले की ''राजाभाऊ दहिवाळ हे केवळ राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते, तर ते जनतेचे आधारस्तंभ होते. त्यांची विचारधारा, सच्चेपणा आणि कार्यासाठीची निष्ठा ही आजच्या पिढीला प्रेरणा देणारी आहे. कार्यक्रमाचे आयोजन दहिवाळ परिवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. शेवटी सर्वांनी सामूहिकरित्या दहिवाळ काकांच्या आठवणींना उजाळा देत मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. या स्मरणदिनानिमित्त त्यांचा सामाजिक योगदानाचा वारसा जपण्याचा निर्धार अनेकांनी व्यक्त केला. कार्यक्रमाची सांगता महाप्रसाद कार्यक्रमाने झाली.यावेळी वैजनाथ बँकेचे चेअरमन श्री विनोद सेठ सामत, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष श्री ऍड.मकरंद पत्की, दीनदयाळ बँकेचे उपाध्यक्ष श्री ऍड.राजेश्वर देशमुख, सराफा ओसिएशनचे अध्यक्ष श्री राहुल जी टाक,श्री सुरेश जी गिरडे साहेब, विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते

---

## क्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे गुरूपौर्णिमा उत्सव उत्साहात

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीगुरू ईश्वरबाबा भारती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गुरूपौर्णिमा उत्सव आज (दि. १०, गुरुवार) मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या शुभहस्ते भगवान बेलेश्वराच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला, तसेच श्रीगुरू ईश्वरबाबा महाराजांच्या समाधीची महापूजा करण्यात आली.



कार्यक्रमात वारकरी मंडळींनी भजनसेवा सादर केली. त्यानंतर महाप्रसादाच्या पंगती पार पडल्या, ज्यात हजारो भाविकांनी सहभाग घेतला. पंचक्रोशीतील भाविकांनी समाधी दर्शन आणि महंतांचे आशिर्वाद घेण्यासाठी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने गर्दी केली होती.''गुरूप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरूपौर्णिमा'' शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज गुरूपौर्णिमेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाणारी ही गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्याची अनोखी परंपरा आहे.महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीस चार वेदांचे ज्ञान दिले. त्यांचा जन्म आषाढ पौर्णिमेला झाला होता, म्हणूनच हा दिवस गुरूपौर्णिमा म्हणून ओळखला जातो. हा दिवस केवळ अध्यात्मिकच नव्हे तर शैक्षणिक, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील गुरूं प्रती आदर व्यक्त करण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे, असे शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले.

---

## ज्ञानसागर गुरुकुलच्या बाल वारकरी दिंडीने सर्वांचे लक्ष वेधले

बीड। प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त ज्ञानसागर गुरुकुल मधील विद्यार्थ्यांनी दि.६ जुलै २०२५ रविवार रोजी विठ्ठल रुक्मिणी व वारकऱ्यांच्या वेशभूषेत टाळ, मृदंगाच्या वाद्या ने विठ्ठल हरी नामाचा गजर करत कल्याण नगर येथून तुकाराम गुरुजी नगर येथील विठ्ठल रुक्माई मंदिर येथे बाल दिंडी काढून परिसरातील वातावरण हरिनामय केले .सदरील बाल दिंडी मंदिर परिसरात गेल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनाचा लाभ घेतला. प्रसादाचे वाटप तांदळे मॅडम यांनी केले. मंदिर परिसरात झालेल्या कार्यक्रमात कु .श्रेया सानप , कु. खुशी वनवे व ज्ञानसागर च्या विद्यार्थ्यांनी विविध धार्मिक गीत गाऊन नृत्यही सादर केले. तुकाराम गुरुजी नगर येथील महिला मंडळांनी सहभाग नोंदवत फुगडी, रिंगण, धार्मिक गाणे गाऊन व विविध कलागुणांचे सादरीकरण करून कार्यक्रमास शोभा वाढवली. कार्यक्रमात शेवटी डॉ.संजय तांदळे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व सांगून विठ्ठला विठ्ठला या गीतावर योगीक जॉगिंग विद्यार्थ्यांकडून करून घेतली.

कार्यक्रमाचा समारोप प्रार्थनेने केला. कार्यक्रमास परिसरातील सौ. सानप मॅडम ,सौ.वनवे, खरात, मोळकर ,घोडके, कुंदन सानप ,नागरे आदी महिला सह ज्ञानसागर गुरुकुल चे विद्यार्थी, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून पोलीस मुख्यालय परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक गोरक्षनाथ तळेकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश सानप तर आभार सौ .स्वाती सानप यांनी मानले.

---

## राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



बीड। प्रतिनिधी

राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय बीड येथे गुरुपौर्णिमे निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती तायडे डी.ओ. ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पाटील ए. आय. व राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. जाधव व्ही.पी. हे होते.


कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांतर्फे अध्यक्ष प्रमुख पाहुणे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त भाषणे केली. राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. घाटे आय.एस. यांनी बोधकथेच्या आधारे गुरुचे महत्त्व सांगितले राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. पाटील पी.एन. यांनी गुरु शिष्यांचे नाते, महर्षी व्यासांचे कार्य तसेच संत परंपरेतील गुरु शिष्य परंपरा यावर मत व्यक्त केले तर प्रमुख पाहुणे श्री. जाधव व्ही.पी. यांनी गुरु हा लहान मोठा नसतो तर चराचरातील प्रत्येक गोष्टीकडून आपण काहीतरी शिकत असतो असे मत व्यक्त केले. तसेच दुसरे प्रमुख पाहुणे श्री. पाटील ए.आय.यांनी गुरु महती विशद केली. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापिका श्रीमती तायडे डी. ओ. यांनी गुरु शिष्य परंपरा व आजची परिस्थिती तसेच गुरु विषयीचे स्वामी विवेकानंदांचे विचार यावर मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री पवार ए. एन. यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वाघमारे ए.के. कु. भुरे गौरी व कु.शेख अनम यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

## ध्वजांची अवहेलना टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाने लक्ष द्यावे डॉ. गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

महापुरुषांच्या जयंतीनिमित्त शहर व ग्रामीण भागात विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. या उपक्रमांची सजावट म्हणून सार्वजनिक ठिकाणी चौकाचौकात, रस्त्यांवर, लोखंडी दुभाजकांवर व पथदिव्यांच्या खांबांवर विविध ध्वज लावले जातात. मात्र, या ध्वजांची योग्य देखभाल न झाल्याने ते फाटतात, जीर्ण होतात आणि काही वेळा पायदळी तुडवलेही जातात. यामुळे त्या ध्वजांचे प्रतीकात्मक महत्त्व कमी होते, तसेच सामाजिक आणि कायदेशीर अडचणी निर्माण होतात. ध्वजांची विटंबना ही कायद्याचे उल्लंघन मानली जाते आणि



त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी स्पष्ट केले आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, ''ध्वज म्हणजे महापुरुषांच्या अस्मितेचे, त्यागाचे, बलिदानाचे प्रतीक आहे. त्यामुळे त्यांची अवहेलना होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.'' पोलिस प्रशासनाने दखल घ्यावी ठोस मागणी जयंती कार्यक्रमासाठी पोलिस परवानगी आवश्यक असतेच. त्यामुळेच पोलिस प्रशासनाने प्रत्येक सार्वजनिक उत्सव समितीला ध्वज व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करताना लेखी सूचना द्याव्यात, असेही डॉ. ढवळे यांनी सांगितले. तसेच जयंतीनंतर ठराविक कालावधीनंतर जीर्ण, फाटलेले, खालवर पडलेले वा दुर्लक्षित ध्वज तातडीने काढून घेण्याची जबाबदारी देखील निश्चित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

---

## बीड समाज कल्याण कार्यालयाची दुर्दशा – मिलिंद सरपते

बीड। प्रतिनिधी

बीड येथील समाज कल्याण कार्यालयात गेल्या अनेक दिवसांपासून प्रचंड अस्वच्छता पाहायला मिळत असून, कार्यालयातील संडास–बाथरूमची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे. तेथे पाण्याची कोणतीही सोय नाही, तर दुसरीकडे घाणीचे साम्राज्य असल्याने कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.दररोज विविध शासकीय योजना, शिष्यवृत्ती, लाभ मिळवण्यासाठी महिला, वृद्ध, विद्यार्थी, दिव्यांग नागरिक मोठ्या संख्येने या कार्यालयात येत असतात. मात्र, तेथे मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेकांनी कार्यालयातील या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, बीड यांना लिखित तक्रार सादर केली आहे. या तक्रारीत त्यांनी तात्काळ स्वच्छतेच्या उपाययोजना, पाण्याची व्यवस्था व जबाबदार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. ''शासकीय कार्यालय म्हणजे लोकसेवेचे केंद्र, आणि तिथेच जर अशा प्रकारची अस्वच्छता असेल, तर ती लोकांच्या आरोग्यासाठी आणि शासनाच्या प्रतिमेसाठी धोकादायक आहे,'' असे सरपते यांनी म्हटले आहे.

---

# प्राचार्य अन्वर शेख यांची युनेस्कोच्या कार्यशाळेसाठी निवड

## भारतातील १०० निवडक प्राचार्यांमध्ये बीडकरांचा समावेश

माजलगाव। प्रतिनिधी

येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलचे कार्यतत्पर प्राचार्य अन्वर शेख यांना युनेस्को तर्फे आरोग्य आणि कल्याण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला बळकटी देण्यासाठी आयोजित केलेल्या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, युनेस्को,एनसीईआरटी आणि सीबीएसई यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या कार्यशाळेचे उद्दिष्ट सीबीएसई संलग्न शाळांमधील मुख्य प्रशिक्षकांना क्षमता निर्माण करून देणे आहे. हे प्रशिक्षक त्यांच्या स्वतःच्या शाळांमध्ये आरोग्य आणि कल्याण कार्यक्रम राबवण्याबरोबरच शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी संसाधन व्यक्ती म्हणूनही काम करतील. या कार्यशाळेसाठी भारतातील हजारो सीबीएसई संलग्न शाळांमधून केवळ १०० प्राचार्यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील फक्त ४ प्राचार्यांचा या यादीत समावेश आहे, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख आणि महावीर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अभिलाष के के यांचा समावेश आहे.सदरील कार्यशाळा दिनांक २१ जुलै ते २५ जुलै २०२५ या



काळात नवी दिल्ली येथे होणार आहे. युनेस्को च्या नवी दिल्ली प्रादेशिक कार्यालयाकडून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमाद्वारे शैक्षणिक संस्थांमध्ये आरोग्य आणि कल्याणाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करण्याचे लक्ष्य आहे. या प्रशिक्षणामुळे प्राचार्य अन्वर शेख यांना आणि सिंदफणा पब्लिक स्कूल ला आरोग्य कार्यक्रमाच्या क्षेत्रात नवीन दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.भारतभरातील केवळ १०० निवडक प्राचार्यांमध्ये स्थान मिळणे हे केवळ बीड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संबंध मराठवाड्यासाठी अभिमानाची बाब आहे. ही निवड म्हणजे अन्वर शेख यांनी आज पर्यंत शिक्षण क्षेत्रासाठी केलेला त्याग, परिश्रम आणि समर्पनाचा योग्य सन्मान होय. त्यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीचा आणि शिक्षण क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीचा हा एक पुरावाच आहे.

या प्रतिष्ठित कार्यशाळेसाठी निवड झाल्याबद्दल प्राचार्य अन्वर शेख यांचे सिंदफणा पब्लिक स्कूलचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, डॉ. वरुणराज तौर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

---

## सादिक इनामदार यांच्यावरचे खोटे गुन्हे मागे घ्या – नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव। प्रतिनिधी

महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षणखधिकाऱ्यांचे बरेच दिवसापासून बरेच घोटाळे चालू असून देखील एका शिक्षणाधिकाऱ्यांचा घोटाळा धारूर चे सादिक इनामदार यांनी बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणचे शिक्षण संचालकांचे शिक्षकांचे व इतर घोटाळे शासनाला निर्देशनात आणून देण्यासाठी वेगळेवेगळे पद्धतीने उपोषण आंदोलन चे निवेदन अर्जद्वारे भ्रष्टाचार उघडा पाडण्याचा प्रयत्न केला.

यादरम्यान काही शिक्षक व महिला शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याचा आरोप करून त्यांच्यावर शासकीय व राजकीय शक्तीचा उपयोग करून खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न हे शिक्षणाधिकारी करीत आहे. म्हणून पोलीस प्रशासनाने सदरील बीड जिल्ह्याचे शिक्षण व शिक्षणाधिकारी यांचे भ्रष्टाचार जनतेसमोर आणून शासनाचे निर्देशनात आणून देत असल्यानेच सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार यांच्यावर एक महिला शिक्षणाधिकारी यांनी षडयंत्राद्वारे खोटे गुन्हे दाखल केले आहे. म्हणून बीड पोलीस प्रशासनाने खोटे गुन्हे मागे घेऊन सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार यांना शिक्षणाधिकारी यांच्या षडयंत्रनेतून मुक्त करावे अशी मागणी समाजवादी पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

# वडवणी तहसील कार्यालयावर गायरान धारकांचा आक्रोश मोर्चा धडकला

वडवणी । प्रतिनिधी

राज्य सरकार प्रकल्पाच्या नावाखाली गायरान धारकाच्या जमिनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहे. तरी जिव गेला तरी चालेल पण एक इंचही जमीन घेऊ देणार नाहीत तसेच जमीन गायरानधारकांना जगण्याचे एकमेव साधन असणाऱ्या जमिनी बाळकावणाऱ्या शासनाच्या विरोधात काल आझाद क्रांती सेनेच्या वतीने अध्यक्ष राजेश घोडे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक दहा जुलै रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी सदरील



आक्रोश मोर्चा वडवणी तहसील कार्यालयावर धडकला.

वडवणी येथे आझाद क्रांती सेनेच्या वतीने गायनधारकांच्या आक्रोश मोर्चाचे आयोजन राजेशजी घोडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेले होते यामध्ये गायरान धारकांच्या ताब्यातील व वहिती खालील असलेल्या जमिनीवर कुठलाही प्रकल्प उभा करू नये, गायनधारकांच्या ताब्यातील जमिनी विनाट नावे करा,गायरान जमिनीचा २०१० चा कायदा करा, सरकारी जमिनीवर पंधरा वर्षांपासून राहत असलेल्या घरा खाली जागा विना अट नावे करा यास विविध मागण्यासाठी दिनांक दहा जुलै रोजी सकाळी अकरा वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालय भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते यावेळी हा आक्रोश मोर्चा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक,वसंतरावजी नाईक चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, संभाजी महाराज चौक या मार्गाने तहसील कार्यालयावर धडकला यावेळी राज्य शासनाच्या विरोधात ◀◀ पान ३ वर

# पाटोद्यात तहसीलच्या पाठीमागच्या साईटवर जाहिराती छापण्याचा घाट

पाटोदा । प्रतिनिधी

शासनाच्या वतीने सर्व नागरिकांना विविध योजनांची माहिती मिळावी यासाठी शासन लाखो रुपये खर्च करत आहे मात्र संबंधित यंत्रणेने पाटोदा तहसील कार्यालयाच्या पाठीमागील साईटवर शासकीय योजनांच्या जाहिराती लावण्यात आल्याने स्थानिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या जाहिरातींमध्ये विविध सरकारी योजनांची माहिती देण्यात आली असली तरी त्यांना प्रदर्शनीय,ठिकाणी न लावता दुर्लक्षित ठिकाणी लावण्यात आल्याने त्या जाहिरातीचा उपयोग काय होणार आहे.



इतकी महत्वाची व लोक हिताची माहिती दडवून ठेवण्यामागे काय उद्देश्य असू शकतो अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे. ही जाहिरात कोणत्या उद्देशाने आणि कोणाच्या सूचनेनुसार लावण्यात आली, या बाबत शंका व्यक्त केली जात आहे.या छायाचित्रात हे स्पष्ट दिसून येते की, जाहिरातींच्या परिसरात कचरा आणि अवस्था बिकट आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकारावर ◀◀ पान ३ वर



**बीड : माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी जि. प. प्राथमिक शिक्षण विभागाला भेट दिली. यावेळी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, प्रभारी उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राऊत दादा, ऋषिकेश शेळके, राहुल चाटे, भेंडेकर यांनी त्यांचा सत्कार केला.**

# संपादीत जमिनीचा थकीत मावेजा थकवल्याने माजलगावच्या उपविभागीय कार्यालयातील साहित्य जप्त

## माजलगाव येथील दिवाणी (वरिष्ठ स्तर) न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाने केली कारवाई

माजलगाव प्रतिनिधी

संपादीत जमिनीचा थकीत मावेजा प्रकरणातील तब्बल ५७ लाख रुपयांच्या रकमेची अंमलबजावणी न केल्याने माजलगाव येथील दिवाणी न्यायालयाने शासन आणि भुसंपादन कार्यालयातील मालमत्तांवर थेट जप्ती आणण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे प्रशासकीय यंत्रणेत मोठी खळबळ उडाली आहे. याबाबतची कारवाई हि दि ०८ जुलै मंगळवार रोजी सायंकाळी जप्तीची कारवाई करण्यात आली असूनउपविभागीय अधिकारी कार्यालयातील टेबल,खुर्ची, कॉम्प्यूटर,बॅटऱ्या आदिसाहित्य ताब्यात घेण्यात आले आहे.

या प्रकरणी मिळालेली माहिती अशी की दिवाणी (वरीष्ठ स्तर) न्यायालयातील दोन वेगवेगळ्या प्रकरणावर सुनावणी झाली. पहिल्या प्रकरणात वादी मोहन आश्रुबा नागरगोजे यांनी २६ लाख ६६ हजार ८०२ रूपये इतकी थकीत रक्कम वसूल करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या आदेश २१ नियम ३० अन्वये प्रकरण न्यायालयात दाखल केले होते. ही रक्कम एल.ए.आर. ८७/२०११ मधील संपादन प्रकरणाशी संबंधित असून न्यायालयीन निर्णय मिळूनही संबंधितांनी मावेजा बाबत अंमलबजावणी केली नव्हती.तर दुसऱ्या प्रकरणात, वादी वैजनाथ व इतर अर्जदारांनी दाखल ◀◀ पान ३ वर

# लोकमान्य टिळक विद्यालयात ‘गुरुपौर्णिमा’ उत्सव

अंबाजोगाई प्रतिनिधी

तालुक्यातील पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात 'गुरुपौर्णिमा' उत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पत्की होते तर व प्रमुख अतिथी म्हणून रा.स्व.संघाच्या अंबाजोगाई शहरचे सहकार्यवाह कृष्णाजी वाघमारे होते.

मान्यवरांच्या हस्ते महर्षी वेद व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कु.दुर्गा निकम व कु.नंदिनी शिंदे या विद्यार्थिनींनी गुरू-शिष्य परंपरा आणि गुरुची महती यावर आधारित गोष्ट सांगितली. वाघमारे यांनी गुरू हे राष्ट्रीय चारित्र्याचे कार्य करण्याची प्रेरणा देतात.गुरू कडून मिळालेल्या ज्ञानाचे विद्यार्थ्यांनी स्थानांतरण करणे गरजेचे आहे.संत



तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा दाखला देत त्यांनी गुरू-शिष्याचे अतूट नाते यावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात पत्की यांनी अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेतो तोच खरा गुरू असतो.अनादीकाळापासून चालू असलेल्या गुरू-शिष्य परंपरेतून विद्यार्थ्यांनी बोध घेत आपल्या जीवनात कायम गुरुविषयी कृतज्ञता दाखवावी असे सांगितले याप्रसंगी सर्वांच्या वतीने कलश पूजन आणि समर्पण करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.प्रिया बळवंत, प्रास्ताविक कु.अक्षरा नेवल, परिचय कु.नेहा वाघमारे,आभार कु.विद्या निकम तर कु.गायत्री होळकर हिच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेतून उपेक्षित वंचित बालकांच्या जीवनात आशेचा किरण

बीड । प्रतिनिधी

शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांग पालकांची मुले, विधवा, घटस्फोटीत महीलांची मुले,आई वडील नसलेल्या अनाथ मुलांसाठी राज्य शासनाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना अंतर्गत या मुलांना दर महिन्याला २,२५०रुपये अनुदान मिळणार आहे.० ते १८ वयोगटातील मुल-मुली या योजनेचा लाभ घेऊ शकतात.



या योजनेमुळे शिक्षण- आरोग्य- आहार या मूलभूत गरजा पूर्ण करण्यास मदत होईल. या योजनेची माहिती आजही अनेक गरजू मुला मुलींना नसल्याने या योजने पासून अशी मुले वंचित राहतात. तरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क साधावा असे आवाहन मा. सभापती तथा नगरसेविका जयश्री विलास विधाते.

# विद्यार्थ्यांनो शैक्षणिक साहित्य हेच तुमचे शस्त्र, यानेच क्रांती घडवा-खुर्शीदआलम

बीड। प्रतिनिधी

जि.प.केंद्रीय प्रा.अशोकनगर शाळेत गुरुआनंद प्रतिष्ठान आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबईच्या वतीने सीमा ओस्तवाल यांच्या माध्यमातून शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मोफत वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष दै.लोकाशा चे संपादक विजय बंब तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळुक, स्वप्निल भैय्या गलधर, मा.सभापती खुर्शीद आलम, संपादक शेख ताहेर,शेख उस्मान,माटे साहेब,पत्रकार अदनान खान, पठाण जफर खान, ड. खाजा इत्यादी प्रमुखांच्या हस्ते



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी विजय राज बंब आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की सीमा ओस्तावाल या २४ तास सामाजिक कार्य करत असतात, तेवढे सामाजिक कार्य माझ्या कडून ही घडत नही. खुर्शीद आलम म्हणाले की शैक्षणिक साहित्य हेच आजच्या युगातील विद्यार्थ्यांचे हत्यार असून यानेच विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्रांती करावी. विस्तार अधिकारी सिद्देश्वर माटे यांनी सीमा ओस्तावाल यांच्या सामाजिक कार्यास तोड नाही. तर मुख्याध्यापक लांडगे मॅडम यांनी मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा ◀◀ पान ३ वर

# गेवराई तहसील कार्यालयासमोर भंगार घोटाळ्याच्या चौकशीसाठी सय्यद एजाज यांचे आमरण उपोषण सुरु

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तहसील कार्यालयात झालेल्या कथित भंगार लिलाव घोटाळ्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. माजी नगरसेवक सय्यद एजाज इफ्तेखार अहमद यांनी तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर संगनमताने आर्थिक गैरप्रकार केल्याचा गंभीर आरोप करत गुरुवार, १० जुलै २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या घोटाळ्यामुळे शासनाचे मोठे नुकसान झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

सय्यद एजाज यांनी



जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, तहसीलदार खोमणे यांनी जप्त वाहनांच्या भंगार लिलावात गंभीर अनियमितता केल्या. लिलावाच्या तारखा वारंवार पुढे ढकलल्या गेल्या आणि २९ मे २०२५ रोजी झालेल्या लिलावात काही व्यक्तींशी संगनमत करून प्रशासनाची फसवणूक केली गेली. एकाच व्यक्तीने दोन अर्ज सादर करून वेगवेगळ्या व्यक्तींना बोलीसाठी बसवले. तसेच, १०,००० ◀◀ पान ३ वर

# गुरु पौर्णिमेपासून धम्मप्रवचन मालिका,वर्षावास कार्यक्रमास उपस्थित राहावे -डॉ.साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगावच्या वतीन भन्ते चैत्यभूमी दादर मुंबई यांचा वर्षावास प्रारंभ व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन जिल्हा शाखा बीड पुर्वच्या अंतर्गत तालुका शाखा माजलगावच्या वतीन आषाढी पौर्णिमा ते आश्वीन पैर्णीमा या तिन महिन्याच्या



वर्षावास कालावधीत विविध ठिकाणी शहरी व ग्रामीण भागामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या पवित्र ग्रंथाचे ग्रंथ वाचन चालु असलेल्या ठिकाणी विविध विषयांची धम्मप्रवचन मालीका राबवण्यात येत आहे.या कार्यक्रमाचा प्रारंभ दि.१० जुलै २०२५ वार ◀◀ पान ३ वर

# मानवी हक्क अभियान आयोजित गायरानधारकांच्या मोर्चात सामील व्हा - रमेश गवळी व अक्षय गवळी यांचे आवाहन

दिंद्रुड । प्रतिनिधी

गायरानधारकांसह मागासवर्गीय समाजाच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी मानवी हक्क अभियान च्या वतीने सोमवार (दि. १४) रोजी माजलगाव येथील उपविभागीय कार्यालयावर मोर्चा धडकणार आहे. मानवी हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली या मोर्चाच्या आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी माजलगाव तालुक्यातील जनतेने बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक रमेश गवळी व अक्षय गवळी यांनी केले आहे.





सन १९७८ ते १९९० या कालावधीमधील गायरान जमिनीचे प्रलंबित प्रकरणे २८ नोव्हेंबर १९९१ च्या शासन निर्णयानुसार नियमित करावेत. ताब्यात असणाऱ्या गायरान जमिनी मधील पिक पंचनामे करून ई- रजिस्टर ला नोंदी घेण्यात याव्यात. आर्टी व बार्टी या संस्थांना ठोस व भक्कम निधी देऊन शिक्षण,संशोधन व कौशल्य विकासासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व निधी उपलब्ध करावा, अण्णाभाऊ साठे महामंडळ, संत रोहिदास महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, वसंतराव नाईक ◀◀ पान ३ वर

# गुरु शिवाय जिवन व्यर्थ आहे - महंत दत्ता महाराज गिरी

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

गेवराई । प्रतिनिधी

ईश्वराचे सगुण रुप म्हणजे गुरु आणि गुरुंचे निर्गुण रुप म्हणजे ईश्वर होय जीवनात प्रत्येकाने गुरु केला पाहिजे. गुरुशिवाय तरणोपाय नाही. अंध:काराचा नाश करुन त्याचे परब्रह्माशी मिलन घडवून आणण्याचे कार्य गुरु करतात त्यामुळे गुरु शिवाय जिवन व्यर्थ आहे असे प्रतिपादन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत ह.भ.प. दत्ता महाराज गिरी यांनी गुरुपोर्णिमेनिमित्त आयोजित



बोलताना केले.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव (ता.गेवराई) येथे महान तपस्वी तपोनिधी वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत ह.भ.प.बुधगिरीजी महाराज यांच्या १११ व्या पुण्यतिथी व गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवार दि.१० जुलै रोजी सकाळी ११ ते १ यावेळेत गुरुपुजनाचा व समाधीवर गंगोदकाचा अभिषेक करुन गुरुपुजन सोहळा तसेच प्रवचण, भजन यासह विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दामोधर भोसले, युवा नेते शिवराज पवार, महादेव गरुड , परमेश्वर काळे, कैलास पांगरे, राजाभाऊ माने सुभाषराव ढोकळे, कैलासबाबा गिरी, रामबप्पा लेंडगुळे, पत्रकार विनोद ◀◀ पान ३ वर

# साडेचार वर्षाच्या वल्लभ मोगरेकरचा सायमलटेनीस चेस स्पर्धेत राष्ट्रीय विक्रम

**एकाच वेळी २१ स्पर्धाकासोबत खेळण्याचा केला विक्रम**

माजलगाव । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे असणारा मूळचा मोगरा,ता.माजलगाव,जि.बीड येथील साडेचार वर्षाच्या चि वल्लभ कुलकर्णी याने तब्बल एकाच वेळी २१ खेळाडू सोबत लढत दिली ङ्गसायमलटेनिअस चेस हा जगातील सर्वात अवघड खेळ मानला जातो.या खेळामध्ये खेळाडूच्या सर्व क्षमतेचा कस लागतो.या खेळामध्ये प्रत्येक बोर्डावरील लवकर आकलन करून पुढील चाल ठरवावी लागते खेळाडूकडे कमी वेळ असतो ङ्गआणि जलदगतीने निर्णय घ्यावे लागतात त्यासाठी विविध चालीचे परिपूर्ण ज्ञान खेळाडूकडे असावे लागते त्याच प्रमाणे प्रचंड आत्मविश्वास लागतो छत्रपती संभाजीनगर येथील



चिमुकला चि.वल्लभने दि ०६ जून २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या सायमलटेनीस चेस स्पर्धेत एकाच वेळी २१ मुलांसोबत खेळण्याचे आव्हान स्वीकारून हा पराक्रम केला.या मध्ये अथर्व देशपांडे (फिडे रेटेड प्लेअर ),रिशान सानप,शौर्य स्वामी,दक्ष स्वामी,अर्णव पारसेवार,रणवीर दाभाडे,अहाना प्रसाद (राष्ट्रीय खेळाडू) वेदश्री अष्टपुत्रे,जनमेजय तपसे,विराज तपसे, शौर्य खरात,श्लोक मठपती,रसराज निकम,अथर्व डुबे शाश्वत सोनवणे, या सारख्या चांगल्या खेळाडू सोबत यशस्वी लढत दिली.या संघर्षपूर्ण लढतीमध्ये आश्चर्यकरपणे विविध ओपनिंगचा प्रतिसाद वल्लभ ने दिला.मिडल गेम मध्ये प्रत्येक बोर्ड वरील स्थिती पटकन ओळखून आक्रमण लावले. तब्बल २ तास २१ खेळाडू सोबत लढत दिली ङ्गयामधील १२ खेळाडूसोबत विजयी ५ खेळाडु सोबत बरोबरी करुन ४ खेळाडूंचा पराजय करत अंतिम निकाल आला.सायमलटेनअस चेसच्या आयोजनामध्ये विशेष प्रोत्साहन छत्रपती संभाजी नगर येथील प्रतिथयश प्राईड ग्रुपच्या सौ शिल्पा बगाडीया यांचे मार्गदर्शन लाभले. ङ्गवल्लभच्या यशाबद्दल छत्रपती संभाजीनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव हेमेन्द्र पटेल तसेच लक्ष्मीकांत जोशी, पत्रकार उमेश मोगरेकर, पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे यांनी विशेष कौतुक केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


# नव्या उपायुक्तांचा दणका; स्पेशल ड्राईव्हद्वारे कारवाई, स्थानिक पोलिसांना फुटला घाम

**पुणे । प्रतिनिधी**

**नवनियुक्त पोलिस उपायुक्तांनी पदभार स्विकारताच धडक मोहिम राबवत कारवाईचा वेगळा पॅटर्न सुरू केला आहे. हद्दीत अचानक 'स्पेशल ड्राईव्ह' राबवत परिमंडळ चारचे उपायुक्त सोमय मुंडे यांनी 'स्पा'च्या आडून चालणाऱ्या वेश्या व्यवसायावरच दंडूका फिरवला. तर दुसरीकडे हार्ट ऑफि सिटी असणाऱ्या मध्यभागात रात्री व दिवसा अशी मोहिम राबवून बेशिस्त वाहन चालकांसोबतच अवैध दारू विक्रेत्यांवर परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी कारवाई केली आहे. नवख्या अधिकाऱ्यांनी अचानक राबवलेल्या या विशेष मोहिमांमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. तर, स्थानिक पोलिसांना घाम फुटला आहे.**

आयपीएस सोमय मुंडे यांनी गडचिरोलीत नक्षलवाद्यांविरोधात उत्कृष्ट काम केले होते. त्यांना राष्ट्रपती शौर्यचक्रपदक देखील मिळाले. लातूर पोलिस अधीक्षक पदावरून त्यांची नुकतीच पुण्यात पोलिस उपायुक्त म्हणून बदली झाली. त्यांना परिमंडळ चारची





जबाबदारी देण्यात आली आहे. परिमंडळ चारचा पदभार स्विकारताच त्यांनी आपली छाप पाडण्यास सुरूवात केली आहे. अवघ्या काही दिवसात अवैध धंद्यांची गुप्त माहिती मिळवत त्यांनी स्पेशल ड्राईव्ह राबवला आहे.

एका दिवसात अचानक केलेल्या मोहिमेत त्यांनी तब्बल अवैध दारू विक्रीप्रकरणात ३५ गुन्हे नोंदवले आहेत. तर दोन हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय देखील उघडकीस आणले. यामुळे गुन्हेगारांच्या मनात तर धडकी भरली आहेच पण स्थानिक पोलिसांना देखील घाम फुटला आहे.

सिंधुदर्गवरून आलेले आयपीएस कृषीकेश रावले यांना परिमंडळ एकची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांनीही अचानक मोहिम राबवत ७ गुन्हे अवैध दारू विक्रीप्रकरणात गुन्हे दाखल केले. सोबतच रात्रीच्या बेशिस्त वाहन चालकांना धडा शिकवत साडे पाचशे वाहनांचे चेकिंग केले. त्यातील १४१ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. तर ११ वाहने जप्त केली आहेत. तर एका ठिकाणी अमली पदार्थांची कारवाई केली आहे. नवनियुक्त उपायुक्तांनी केलेल्या या धडक मोहिमांमुळे सर्वांनाच घाम फुटला आहे.

पर्वतीत दोन तरुणांवर टोळक्यांकडून हल्ला

राज्यात गुन्हेगारी वाढली असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून, खून, मारामाऱ्या, दरोडे, अपहरण अशा घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पर्वती परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन तरुणांवर टोळक्यांकडून धारदार व लोखंडी हत्याराने हल्ला करून गंभीर जखमी केल्याच्या घटना घडल्या आहेत. किरकोळ कारणांवरून टोळक्याने दादागिरी करत मारहाण केली आहे. यामुळे सहकारनगर तसेच दत्तवाडी परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

## शिरूरमध्ये सायबर फसवणुकीचा धक्कादायक प्रकार; प्रितम-प्रकाश नगरमधील नागरिकाच्या खात्यातून १ लाख रुपये लंपास




शिरूर : शिरूर शहरातील प्रितम-प्रकाश नगर येथील एका रहिवाशाच्या बँक खात्यातून अज्ञात सायबर चोरट्यांनी ऑनलाईन फसवणूक करत १ लाख रुपये लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणाने परिसरात खळबळ उडाली असून, सायबर सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

प्रितम-प्रकाश नगर येथील किशोर सावळेराम कवडे (वय ३९, व्यवसाय-नोकरी) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ जुलै रोजी संध्याकाळी ८ वाजण्याच्या सुमारास कवडे यांच्या एचडीएफसी बँक, शिरूर शाखेतील खात्यातून दोन ऑनलाईन व्यवहारांद्वारे प्रत्येकी ५०,००० रुपये, असे एकूण १ लाख रुपये काढले गेले. विशेष म्हणजे, या व्यवहारांसाठी कवडे यांना कोणताही ओटीपी किंवा पुष्टीसंदेश प्राप्त झाला नाही. त्यांनी कोणालाही बँकेची माहिती दिली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सायबर चोरट्यांनी अत्यंत हुशारीने फसवणूक केल्याचे दिसते. बँक ग्राहकाची कोणतीही सक्रिय भूमिका नसताना रक्कम काढली गेल्याने बँकिंग प्रणालीतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिरूर पोलिसांनी आयटी ॲक्ट व भारतीय दंड विधानानुसार गुन्हा दाखल केला आहे.नागरिकांना आवाहन: बँक माहिती, ओटीपी, पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका. संशयास्पद व्यवहार आढळल्यास त्वरित १९३० वर संपर्क साधा किंवा www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा, असे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले.

## भोर तालुक्यात कांबरे खेबा गावात बिबट्याचा वावर; ग्रामस्थांमध्ये भीती, वनविभागाकडे दुर्लक्षाची तक्रार

नसरापूर : भोर तालुक्यातील कांबरे खेबा या गावांमध्ये मागील काही दिवसांपासून बिबट्याचा वावर सातत्याने दिसत असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


File Photo

काल पहाटे ३.१८ वाजता बुआसाहेब वाडी रोडवरील सदाशिव निवास गेटजवळील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्याचा वावर पुन्हा स्पष्टपणे दिसला. हा व्हिडिओ ग्रामस्थांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर शेअर करून सर्वांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या आधीही बिबट्याचे दर्शन झाल्याच्या अनेक घटना घडल्या असून काही पाळीव जनावरांची बिबट्याने शिकार केल्याचे स्थानिकांनी सांगितले. मात्र, अद्याप वनविभागाकडून ठोस कारवाई झालेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. माझी पोलीस अधिकारी सुनील शेलार यांनी ग्रामपंचायतीतील सदस्यांना सूचना देताना सांगितले की, बिबट्या विषयक घटनांबाबत वनविभागाशी अधिकृत पत्रव्यवहार करा. भविष्यात एखादी दुर्घटना झाली तर जबाबदार कोण हे निश्चित व्हायला हवे.शेलार यांनी पुढे असेही सांगितले की, वनविभागाला सांगून त्यांनी रात्रीची गस्त सुरू करावी जेणेकरून कोणतीही हानी होणार नाही. गावकऱ्यांनीही सतर्क राहावे आणि बिबट्या दिसल्यास तातडीने वनविभागाला माहिती द्यावी.

सुनील शेलार यांच्या या प्रश्नाला ग्रामपंचायत सदस्यांनी उत्तर देताना सांगितले की, आम्ही लवकरच वनविभागाशी संपर्क करून आवश्यक ती कारवाई करू. तरीदेखील, ग्रामस्थांनी तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे. सध्या परिसरात लहान मुलांसह वयोवृद्ध व्यक्तींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांनी अनावश्यकपणे घराबाहेर न पडता सुरक्षित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न लवकरच मिटणार; हडपसर-उरळी कांचनदरम्यान सहा पदरी उड्डाणपूल होणार

पुणे : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी व वाढते अपघात कमी करण्यासाठी राज्य सरकारने हडपसर-यवत दरम्यान सहा पदरी रस्त्याला नुकतीच मंजुरी दिली. यात हडपसर ते उरळीकांचन दरम्यान तब्बल २५ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे.



महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या वतीने हे काम केले जाणार असून, त्यासाठी ५२६२ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. २० ऑगस्टपासून या कामाच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. काम पूर्ण होण्यास किमान पाच वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दररोज सुमारे ५० हजारपेक्षा जास्त वाहने धावत आहे. यात प्रवासी वाहनासह माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या देखील अधिक आहे.

सोलापूर, हैदराबाद, बारामती या भागातून पुण्यात दाखल होणाऱ्या वाहनांची संख्या अधिक असल्याने वाहनधारकांना उरळी कांचनपासूनच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. हीच स्थिती पुण्यातून बाहेर पडणाऱ्या वाहनचालकांची असते. त्यांना देखील मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा फटका सहन करावा लागत आहे. यावर तोडगा म्हणून सहा पदरी उड्डाणपूल बांधण्यात येत आहे. यामुळे प्रवाशाच्या वेळेत किमान ३० मिनिटांची बचत होणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या नव्या उड्डाणपुलामुळे हजारो वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे.

कसा असणार उड्डाणपूल?

- हडपसर येथील रवीदर्शन सिग्नल पासून उड्डाणपुलाला सुरुवात
- २५ किलोमीटरचा लांबीचा असणार हा पूल.
- हडपसर- मांजरी- लोणी- उरळी कांचन-भिवरी- केसनंद फाटा - यवत असा हा मार्ग असेल.
- हडपसर ते उरुळी कांचन असा २५ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल
- हडपसर ते यवत असा ३१.५ किलोमीटरचा रस्ता सहा पदरी केला जाणार.

या उड्डाणपुलाचा फायदा काय?

- सध्या हडपसर, उरुळी कांचन, लोणी काळभोर परिसरात सकाळी आणि सायंकाळी ३० ते ४५ मिनिटांची वाहतूक कोंडी होते. ती कमी होणार.
- हडपसर ते यवत प्रवासाला सध्या ६० ते ७५ मिनिटे लागतात. त्याचा कालावधी किमान ३० मिनिटांनी कमी होण्यास मदत.
- अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.
- पीएमपी, एसटी गाड्यांना यवत, सासवड, बारामतीसाठी वेळेवर धावतील. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला फायदेशीर.
- उरुळी कांचन, लोणी काळभोर, भिवरी, यवत यांसारख्या गावांचा पुण्याशी संपर्क जलद व सुलभ होईल.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेस चालना मिळेल.
- इंधन आणि वाहन चालकांचा वेळ वाचणार.

## ई - बालभारतीची जुनी इमारत पाडणार; सुसज्ज नवी इमारत लवकरच उभारणार - शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील ई - बालभारतीची मुख्य इमारत अत्यंत कमकुवत झाल्यामुळे तातडीने पुनर्बांधणी करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिली.**

पुणे येथील ई - बालभारती कार्यालयाची म्हणजेच बालचित्रवाणीची इमारत जुनी झाल्याने नवीन इमारत बांधण्यासंदर्भात सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी लक्षवेधीद्वारे प्रश्न विचारला होता. त्यास राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी उत्तर दिले. यात सदस्य जगन्नाथ अभ्यंकर, विक्रम काळे, किशोर दराडे यांनी सहभाग घेतला.

राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले की, बालभारतीची स्थापना २७ जानेवारी १९६७ रोजी झाली. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शासनमान्य अभ्यासक्रमाची पुस्तके याच ठिकाणी छापली जातात आणि संपूर्ण महाराष्ट्रभर वितरित केली जातात. सध्या अस्तित्वात असलेली इमारत लोड बेअरिंग स्ट्रक्चरमध्ये बांधण्यात आलेली आहे. या इमारतीच्या






स्ट्रक्चरल ऑडिट अहवालानुसार या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे ही इमारत नव्याने बांधण्यासाठी लवकरच नियामक मंडळापुढे प्रस्ताव मांडून मान्यता घेतली जाईल आणि मंजुरी मिळाल्यानंतर काम सुरू केले जाईल.राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी 'एससीईआरटी' आणि 'एनसीईआरटी' अभ्यासक्रमासंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना स्पष्ट केले की, राज्य शासनाच्या धोरणानुसार स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रम तयार केला जाईल. तसेच बालभारतीने तयार केलेल्या वर्कबुक्सचा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला जाईल.राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना सादर करताना सांगितले की, राज्यभरातील वापरलेली पुस्तके आणि वह्या गोळा करून त्यांचा पुनर्वापर केला जाईल आणि त्यातून नवीन वह्या व पुस्तके विद्यार्थ्यांना कमी दरात उपलब्ध होतील. तसेच, ज्या ठिकाणी बालभारतीच्या मालकीच्या जागा आहेत, त्या ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा उभ्या करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले.

## मनाला चटका लावणारा अंत..! वाहतूक पोलिसाने कर्तव्यावरच घेतला अखेरचा श्वास

पुणे : पुणे शहर वाहतूक शाखेतील पोलीस नाईक धनाजी भरत वणवे (वय ४२) यांचे बुधवारी (९ जुलै २०२५) सायंकाळी कात्रज मंडई चौकात कर्तव्य बजावताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. सायंकाळी ६:४५ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या दुर्दैवी घटनेने पुणे पोलीस दलात शोककळा पसरली आहे. त्यांच्या अकस्मात निधनाने सहकारी आणि कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.

'त्या' रात्री काय घडलं?

धनाजी वणवे नेहमीप्रमाणे कात्रज मंडई चौकात वाहतूक नियमनाचे कर्तव्य बजावत होते. अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. उपस्थित सहकाऱ्यांनी आणि स्थानिकांनी तातडीने त्यांना कात्रजमधील साईस्नेह रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचार सुरू करण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

कर्तव्यातील समर्पणाचा आदर्श

धनाजी वणवे यांनी पुणे शहर वाहतूक शाखेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे आणि शिस्तबद्धपणे सेवा बजावली. वाहतूक



नियंत्रणासारख्या आव्हानात्मक आणि तणावपूर्ण कामातही त्यांचा शांत आणि सकारात्मक दृष्टिकोन सहकाऱ्यांमध्ये त्यांना लोकप्रिय बनवायचा. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेमुळे ते पुणे पोलिस दलात आदराने ओळखले जायचे. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत त्यांच्या समर्पित सेवेचा गौरव केला.

कुटुंबावर दुःखाचा डोंगर

वणवे यांच्या पश्चात त्यांचे आई-वडील (भारत वामन वणवे आणि लोचना भारत वणवे), पत्नी रुपाली वणवे, मुलगी सिद्धी (वय १५), आणि मुलगा शिवराज (वय ४) असा परिवार आहे. त्यांच्या अचानक निधनाने कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. पुणे पोलीस दलाने कुटुंबाला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

पोलिस दलाची आदरांजली

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासह वाहतूक विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांनी वणवे यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. धनाजी वणवे हे खऱ्या अर्थाने कर्तव्यदक्ष आणि शौर्यवान अधिकारी होते. त्यांचे निधन ही पुणे पोलिस दलासाठी मोठी हानी आहे, असे आयुक्तांनी व्यक्त केले. वणवे यांच्या अंत्यसंस्काराला पोलीस दलातील अनेकांनी हजेरी लावून त्यांना शेवटचा सलाम केला.

## आपत्कालीन परिस्थितीसाठी पुणे जिल्हा प्रशासन सज्ज; दहा सॅटेलाईट फोनची केली व्यवस्था

पुणे । प्रतिनिधी

आपत्ती अथवा आणीबाणीच्या परिस्थितीत जिल्हा प्रशासनाचा संपर्क कायम राहावा यासाठी पुणे जिल्ह्यातील १० तहसील कार्यालयांमध्ये सॅटेलाईट फोन सज्ज ठेवण्यात आले आहेत. दुर्गम, दरडग्रस्त तसेच पूरप्रवण भागांमध्ये नेहमीच मोबाईल नेटवर्कची अडचण निर्माण होते. त्यामुळे दुर्घटना घडल्यावर माहिती वेळेवर प्रशासनाकडे पोहोचत नाही आणि मदत कार्यात विलंब होतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने हा निर्णय घेतला आहे.



सॅटेलाईट फोन थेट उपग्रहांशी संपर्क साधून काम करतो. त्यामुळे कोणतेही मोबाईल नेटवर्क नसले तरी संवाद साधता येतो. सॅटेलाईट फोनवरून मोबाईल व लँडलाईन नंबरवर थेट संपर्क साधता येतो, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे शक्य होते. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, वेल्हा, भोर, पुरंदर, बारामती आणि दौड या १० तहसील कार्यालयांमध्ये सॅटेलाईट फोन उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यामध्ये विशेषतः दौड आणि बारामती हे पूरप्रवण तालुके असून, मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसात या भागांतील अनेक गावांचा संपर्क तुटला होता. अशा वेळी सॅटेलाईट फोनमुळे जिल्हा प्रशासनाशी संपर्क राखणे शक्य होते. मान्सून काळात भटकंतीसाठी जुन्नर ते भोर या पट्ट्यात पर्यटकांची मोठी गर्दी असते. तसेच पालखी सोहळे, उत्सव, डोंगरदऱ्यांतील यात्रा आणि दरड कोसळण्याच्या घटनाही घडतात. या पार्श्वभूमीवर सदर तालुक्यांमध्ये सॅटेलाईट फोनची उपलब्धता अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### काय आहे सॅटेलाईट फोन?

हा फोन जो थेट पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहांशी संवाद साधून कॉल किंवा मेसेज पाठवतो. सामान्य मोबाईल फोन मोबाइल टॉवर्सवर अवलंबून असतो. पण सॅटेलाईट फोनला मोबाईल टॉवरची गरज लागत नाही. या फोनची बॅटरी दीर्घकाळ टिकते त्याच कारण म्हणजे हा फोन सतत सिग्नल शोधत नाही. सामान्य फोनपेक्षा सॅटेलाईट फोन व सेवा दोन्ही महाग असते. मात्र, सॅटेलाईट फोन खरेदी व वापरासाठी शासनाची विशेष परवानगी आवश्यक असते.

## पुणे-खडकी कॅन्टोन्मेंटचे महापालिकेत विलीनीकरणाला तत्त्वत: मान्यता; आमदार सुनील कांबळे यांची माहिती

पुणे । प्रतिनिधी

महापालिका हद्दीत असलेल्या पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा महापालिकेत समावेश करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वत: मान्यता दिली आहे. या समावेशाबाबत आज मंत्रालयात बैठक पार पडली या बैठकीत संरक्षण विभागाच्या प्रस्तावानुसार पुढील तीन महिन्यात विलीनीकरणाची प्रक्रीया पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याचे आमदार कांबळे यांनी सांगितले.






नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार सिध्दार्थ शिरोळे, महापालिका आयुक्त नवल किशोर राम. यांच्यासह दोन्ही बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी या बैठकीस उपस्थित होते. तर, संरक्षण विभागाचे अधिकारी दिल्लीवरून ऑनलाईन बैठकीत सहभागी झाले होते.

या दोन्ही बोर्डांच्या विलिनीकरणासह कांबळे यांनी सातत्याने राज्यशासनाकडे पाठपुरावा केला होता. महापालिका हद्दीच्या लगत असूनही या भागातील अनेक नागरिकांना मुलभूत सुविधांसाठी अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याने हे विलीनीकरण व्हावे अशी मागणी अनेकदा शासनाकडे केली असल्याचे कांबळे यांनी सांगितले.